cmyk

## संपादकीय

### डोंबीवली स्फोटात व्यवस्थेसह सरकारही दोषी

१९८४ मध्ये देशाला बुडापासून हादरवून सोडणाऱ्या भोपाळ येथील युनियन कार्बाईड दुर्घटनेनंतर रासायनिक उद्योग आणि या उद्योगांमधील संरक्षणात्मक उपायांचा समावेश असणारा 'एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन ॲक्ट' १९८६ साली संसदेत मंजूर करण्यात आला व तो देशभर लागू झाला. या कायद्याबरोबरच देशातील रासायनिक उद्योगांसाठी आणखी सात कायदे लागू आहेत.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### देशातील उष्णतेची लाट ओसरणार

पुणे : गेल्या काही दिवसांपासून देशात उष्णतेची लाट सुरू आहे. लोक उष्णतेमुळे हैरान झाले होते. परंतु येत्या ३ दिवसात देशातील बहुतांश भागातील उष्णतेची लाट ओसरणार असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. आयएमडीचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी सोमवारी (दि.२७) ''नैऋत्य मान्सून, २०२४ च्या पल्ल्याचा दुसरा टप्पा' या विषयावर पत्रकार परिषद घेतली. यावेळी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बोलताना देशातील बहुतांश भागातील उष्णतेची लाट पुढील तीन दिवसानंतर हळूहळू कमी होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वायव्य भारत आणि देशाच्या मध्यभागी उष्णतेच्या लाटेपासून तीन दिवसांनंतर आराम मिळण्याची अपेक्षा आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–४७ मंगळवार दि.२८ मे २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

# राज्यात जूनमध्येच पडणार जास्तीचा पाऊस

## हवामान खात्याचा अंदाज शेतकऱ्यांना दिलासा देणारा



नवी दिल्ली | वृत्तसंस्था

**शेतकऱ्यांना दिलासा देणारा अंदाज सोमवारी हवामान विभागाने दिला. जून महिन्यात राज्यात यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज आहे. तर देशातील बहुतांशी भागात जूनमध्ये पाऊस चांगला राहील. तसेच मान्सून हंगामात म्हणजेच जून ते सप्टेंबर या काळात देशात यंदा सर्वसाधारण म्हणजेच १०६ टक्के पाऊस पडण्याचा सुधारीत अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने सोमवारी (दि.२७) जाहीर केला.**

नवी दिल्ली येथे आयोजित पत्रकार परिषदेत हवामान शास्त्र विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी मान्सून पावसाचा सुधारित दीर्घकालीन अंदाज सोमवारी जाहीर केला. हवामान विभागाने १५ एप्रिल रोजी जाहीर केलेल्या पहिल्या दीर्घकालीन अंदाजात देशभरात १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. सुधारीत अंदाजानुसार मान्सूनमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता सर्वाधिक (३२ टक्के), तर दुष्काळाची शक्यता अवघी २ टक्के असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. प्रमुख विभागनिहाय पावसाचे वितरण लक्षात घेता ईशान्य भारतात यंदा कमी पावसाची शक्यता आहे. पूर्वोत्तर राज्यांसह वायव्य भारताचा उत्तरेकडील भाग, पूर्व भारताच्या काही भागात सरासरी ते सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या सुधारित अंदाजात महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस राहील, असा अंदाज दिला. म्हणजेच पाऊस चांगला पडण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात केवळ जून महिन्यातच नाही तर संपूर्ण मान्सून हंगामात सरासरीपेक्षा जास्त म्हणजेच ◀◀ पान २ वर

### ५ दिवसांमध्ये मान्सून दाखल

केरळमध्ये पुढील ५ दिवसांमध्ये मान्सून येईल, असाही अंदाज हवामान विभागाने दिला. मान्सूनच्या प्रगतीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील ५ दिवसांमध्ये मॉन्सून केरळ आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये दाखल होऊ शकतो, असे हवामान विभागाने म्हटले आहे.

### एल–निनो जावून ला–निना स्थिती तयार होतेय...

विषुववृत्तीय प्रशांत महासागरातील एल-निनो स्थिती वेगाने निवळत आहे. समुद्र पृष्ठभागाचे तापमान सर्वसाधारण स्थितीवर येत आहे. जागतिक हवामान प्रारूपानुसार (मॉडेल) मान्सून हंगामाच्या सुरूवातीला एल-निनो स्थिती सामान्य होणार असून, जुलै महिन्याच्या अखेरीस ला- निना स्थिती तयार होण्याचे संकेत आहेत. ला-निना स्थिती मान्सूनच्या पावसाला पोषक समजली जाते. यातच विषुवृत्ताजवळील बंगालच्या उपसागर आणि अरबी समुद्रातील तापमानाचा फरक (इंडियन ओशन डायपोल-आयओडी) सध्या सर्वसाधारण स्थितीत आहे. मॉन्सून हंगामातही ही स्थिती धन (पॉझिटीव्ह) होण्याची शक्यता आहे. धन आयओडी भारतातील पावसासाठी पोषक ठरतो.

## राष्ट्रवादी पक्ष मनुस्मृतीचा अभ्यासक्रमात सहभाग होऊ देणार नाही–छगन भुजबळ



मुंबई | प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही फुले –शाहू –आंबेडकर यांच्या विचारांची असून राज्य सरकारमध्ये सहभागी आहे. त्यामुळे राज्यातील शालेय शिक्षणांमध्ये मनुस्मृतीचा समावेश हा कदापी सहन करणार नाही. जोपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सत्तेत आहे तोपर्यंत मनुस्मृती ही शाळांमध्ये शिकवू देणार नाही, असा इशारा राज्याचे मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी दिला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आढावा बैठकीमध्ये ते बोलत होते. पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, हा महाराष्ट्र ज्या महापुरुषांनी घडवला त्या महापुरुषांची शिकवण लहान मुलांना देणे गरजेचे आहे. जे कां रंजले गांजले । त्यासी ह्मणे जो आपुले ।। तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।। असा उपदेश देणारे तुकाराम महाराज असतील किंवा अवघे विश्वची माझे घर असे शिकविणारे संत ज्ञानेश्वर महाराज असतील. त्यांची शिकवण देणे आवश्यक असल्याचे सांगत 'धर्म, राज्य, भेद हे मानवा नसावे, सत्याने वर्तावे इशासाठी' असे शिकवण देणारे महात्मा फुले असतील किंवा ''पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे'' असे ठणकावून सांगणारे अण्णाभाऊ साठे यांची शिकवण ◀◀ पान २ वर

# यंदा दहावीच्या निकालात १.९८ टक्क्याने वाढ

## विभागीय निकालात कोकण पहिले, तर नागपूरचा सर्वात कमी निकाल



पुणे | प्रतिनिधी

**राज्यातील १० वी परिक्षेचा निकाल राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सोमवारी जाहिर केला आहे. राज्यात निकालात उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण वाढले असून, गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी १.९८ टक्क्याने निकाल वाढीव स्वरूपात लागला आहे. यंदाच्या निकालात कोकण विभागाने बाजी मारली असून त्यांच्या ९९.१ टक्के निकाल लागला आहे. तर सर्वात कमी निकाल नागपूरचा असून ९४.७३ टक्के त्यांचा निकाल लागला. याबाबतची माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.**

पुढे बोलताना शरद गोसावी म्हणाले की, दहावीच्या परिक्षेला बसणाऱ्यांचे प्रमाण यंदाच्यावर्षी वाढले होते. एकूण १६ लाख विद्यार्थ्यांनी १० वी परिक्षेसाठी अर्ज भरला होता. निकालात मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९७ टक्के जास्त असून मुले ९४.५६ टक्के उत्तीर्ण झाले आहेत. ◀◀ पान २ वर

### संभाजीनगर विभागात बीड सर्वप्रथम

छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वप्रथम येण्याचा मान यंदाही बीड जिल्ह्याने पटकावला आहे. बीड जिल्ह्याचा विभागामध्ये सर्वाधिक ९७.४० टक्के निकाल लागला आहे. छत्रपती संभाजी नगर जिल्हा (९५.५१) दुसऱ्या स्थानी असून जालना (९४.९९) तिसऱ्या तर परभणी जिल्हा (९३.०३) चौथ्या स्थानी आणि हिंगोली जिल्हा (९२.५२) पाचव्या स्थानावर असल्याचे बोर्डाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. बीड जिल्ह्यातून एकूण ४१ हजार ५७१ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. ४० हजार ४९४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या सर्वांचा एकत्रित निकाल ९७. ४० टक्के इतका लागला आहे.

## राज्याच्या सहकार आयुक्तपदी तावरे

पुणे: राज्याच्या रिक्त असलेल्या सहकार आयुक्तपदी भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी दिपक तावरे यांच्या नियुक्तीचे आदेश शासनाने सोमवारी जारी केले आहेत. तत्कालीन सहकार आयुक्त अनिल कवडे हे सेवानिवृत्त झाल्यानंतर सहकार आयुक्त पदाचा अतिरिक्त पदभार सहकार विभागातील ज्येष्ठ अधिकारी व सहकारचे अपर आयुक्त शैलेश कोतमिरे यांच्याकडे देण्यात आला होता. आता तावरे यांच्या नियुक्तीने सहकार आयुक्तपदी पूर्णवेळ अधिकारी मिळाल्याने कामकाजास गती येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

देशात सहकार क्षेत्रात महाराष्ट्र राज्य अग्रस्थानी असून सहकार ◀◀ पान २ वर

## आरोग्याचे कारण देत जामीनात मुदतवाढीसाठी केजरीवाल सुप्रीम कोर्टात

नवी दिल्ली | वृत्तसंस्था

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अंतरिम जामीनामध्ये ७ दिवसांची मुदतवाढ मिळण्याच्या मागणीसाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. केजरीवाल यांनी आरोग्याचे कारण देत वैद्यकीय चाचण्यांसाठी सात दिवसांची मुदतवाढ हवी, असे याचिकेत म्हटले आहे.

दिल्ली मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणी अरविंद केजरीवाल यांना लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वोच्च न्यायालयाने १० मे रोजी २१ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला होता. शेवटच्या टप्प्यात १ जून रोजी मतदान होणार आहे. मतदान होताच केजरीवाल यांना २ जून रोजी तिहार तुरुंगात परतावे लागणार आहे. जामिनाची मुदत १ जून रोजी संपत असल्याने ती वाढवून मिळण्यासाठी केजरीवाल यांनी आरोग्याचे कारण दिले आहे. माझे ◀◀ पान २ वर

## कपडे धुण्यासाठी गेलेल्या मायलेकरांचा तलावात बुडून मृत्यू

म्हसोबाचीवाडी | प्रतिनिधी

**कपडे धुण्यासाठी तलावावर एका महिलेचा आपल्या मुलासह बुडून मृत्यू झाल्याची घटना आष्टी तालुक्यातील पिंपळगाव घाट येथे रविवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घडली. यामध्ये बुडत असलेल्या मुलाला वाचविण्याच्या प्रयत्नात आईचाही मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.**



पिंपळगाव घाट गावातील वैष्णवी शंकर घोडके या त्यांचा मुलगा समर्थ घोडके याच्या सोबत गावालगत केळ पिंपळगाव व पिंपळगाव घाट या दोन्ही शिवाराच्या मधोमध असणाऱ्या तलावावर कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. कपडे धुत असताना मुलगा समर्थ तलावामध्ये बुडत असल्याचे ◀◀ पान २ वर

# पीक कर्ज वसुलीस स्थगिती द्या!

## राजू शेट्टी यांच्या मागणीला शासन आता तरी गांभिर्याने घेणार का?

पुणे | प्रतिनिधी

**राज्यात त्वरित दुष्काळ जाहीर करून पीक कर्ज वसुलीस तातडीने स्थगिती द्यावी. दुष्काळाची सर्वाधिक तीव्रता असलेल्या महसूल क्षेत्रात पीक कर्जमाफी घोषित करावी. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी. जनावरांसाठी विनाविलंब चारा छावण्या सुरु कराव्यात, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी केली. आता शासन निवडणुकिच्या व्यापातून मोकळे झाले आहे, त्यामुळे आता या मागणीला गांभीर्याने घेणार का असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे राजू शेट्टी यांनी सोमवारी (दि.२७) रोजी शेतकऱ्यांसाठी विविध मागण्या केल्या आहेत. शेट्टी यांनी दुपारी विभागीय आयुक्तांची भेट घेत मागण्यांचे निवेदन दिले आणि विस्तृत चर्चा केली. राज्य दुष्काळाने होरपळली जात असून पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

### पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर

पाण्यासाठी महिलांना वणवण फिरावे लागत असून जनावरे चाऱ्यासाठी तडफडत आहेत. शासन व्यवस्था ठप्प असून प्रशासन हालचाल करत नसून आचारसंहितेचा बागलबुवा दाखवून निर्णय होत नाही. महावितरण कंपनीने विजेचे कनेक्शन तोडत आहे. शासनाची जबाबदारी म्हणून दुष्काळासाठी त्यांनी तातडीने उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. अन्यथा जनता रस्त्यावर ◀◀ पान २ वर

# लॉजमधील कुंटनखाना पोलिसांकडून उद्ध्वस्त!

## महिलेसह दोघे ताब्यात; एएचटीयू कक्षाची कारवाई

गेवराई | पतिनिधी

**गेवराई शहरातील गर्दीच्या ठिकाणी असलेल्या लक्ष्मी लॉजमध्ये कुंटनखाना सुरु असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक कक्षाच्या पोलीस उपनिरीक्षक मिना तुपे यांना मिळाली. सोमवारी (दि.२७) छापा मारत मॅनेजर, लॉज मालक, महिलेला ताब्यात घेत गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.**

लक्ष्मी लॉज परिसरावत सापळा रचत डमी ग्राहक पाठवून या कुंटनखान्याचा पर्दाफाश करण्यात आला. यावेळी व्यवस्थापक कैलास सोमिनाथ भोसले (वय २९ रा.कवडगाव ता.गेवराई), लॉज मालक रामेश्वर किसनराव प्रभाळे (वय ४२ रा.गेवराई), यांच्यासह महिलेला ताब्यात घेतले. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात कलम ३, ४, ५, अनैतिक व्यापार प्रतिबंध १९५६ नुसार गुन्हा दाखल करण्यात ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ७.५० क्विंटल | | |
| २,४०० | २,४०० | २,४०० |
| ज्वारी/हायब्रिड : १०७.५० क्विंटल | | |
| १,८०१ | ३,२०० | २,५३३ |
| मूग : १.५० क्विंटल | | |
| ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| तूर : २९.०० क्विंटल | | |
| ९,५०० | १२,१८० | ११,१६० |
| उडीद : ०.५० क्विंटल | | |
| ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: ५०.५० क्विंटल | | |
| १,९१० | २,६२६ | २,३८५ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | | |
| १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन:१०९.०० क्विंटल | | |
| ४,४५० | ४,५६० | ४,५०९ |
| हरभरा: २६.५० क्विंटल | | |
| ६,१०१ | ६,७०१ | ६,४३२ |


# जिल्ह्यातील नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा !

## » जिल्हाधिकारी दिपा मुधोळ यांचे आदेश, तालुकानिहाय नियंत्रण कक्ष स्थापन

बीड | प्रतिनिधी

**मागच्या दोन दिवसांत बीड जिल्ह्याच्या काही भागात वादळी वारे व वीज पडल्यामुळे शेतीपिकांचे व पशुधनाची मोठी हानी झालेली आहे. या नूकसानीची पाहणी करुन पंचनामे करण्याबाबत सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना जिल्हाधिकारी दिपा मुधोळ–मुंडे यांनी आदेशीत केले आहे, यासाठी तालुकानिहाय नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.**







बाधित व्यक्तींना मदत करण्यासाठी सर्व तहसिल कार्यालयांमध्ये नायब तहसिलदार महसूल यांचा समावेश असलेला नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. कोणत्याही नागरिकांना नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीबाबत काही माहिती द्यावयाची असल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन दीपा मुधोळ, जिल्हाधिकारी बीड यांनी केले आहे.

### प्रत्येक तालुकानिहाय नियंत्रण कक्ष

बीड (सुरेंद्र डोके) ९४२२७४२६७५, गेवराई (सुभाष कट्टे) ८४८४९१४४४४, शिरूर (शिवनाथ खेडकर) ९९२२६२२०२५, वडवणी (संजय जिरंगे) ९५५२०६४७६७, धारूर (प्रकाश गोपड) ७२७६७३४४८८, अंबाजोगाई (सचिन देशपांडे) ९९२१७६४४४४, केज (लक्ष्मण धस) ९८५०४२८३८३, परळी (बाबुराव रुपनर) ९४२२९३०५४२, पाटोदा (संतोष बन) ९४२२५५०८९०, १०.आष्टी (बाळदत्त मोरे) ७७१९९५०९९९, ११.माजलगाव (परमेश्वर चाफाकानडे) ९४०४२४१८८३

cmyk

अग्रलेख

# डोंबीवली स्फोटात व्यवस्थेसह सरकारही दोषी

१९८४ मध्ये देशाला बुडापासून हादरवून सोडणाऱ्या भोपाळ येथील युनियन कार्बाईड दुर्घटनेनंतर रासायनिक उद्योग आणि या उद्योगांमधील संरक्षणात्मक उपायांचा समावेश असणारा 'एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन ॲक्ट' १९८६ साली संसदेत मंजूर करण्यात आला व तो देशभर लागू झाला. या कायद्याबरोबरच देशातील रासायनिक उद्योगांसाठी आणखी सात कायदे लागू आहेत. या सगळ्या कायद्यांची आपल्या व्यवस्थेत यंत्रणांकडून किती प्रामाणिक अंमलबजावणी होते याचा प्रत्यक्ष पुरावा डोंबिवलीमधील अंबर (अमूदान) केमिकल कंपनीत झालेल्या भीषण स्फोटाने दिला आहे. जवळपास सहा ते सात कि.मी. चा परिसर हादरवून सोडणाऱ्या या भीषण स्फोटाने १३ निष्पाप कामगारांचा बळी घेतला तर ६४ जणांना जखमी केले. जखमींपैकी अनेकांची स्थिती गंभीर आहे त्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहेच.

स्फोटानंतर खडबडून वगैरे जागे झालेल्या प्रशासनाने दोन मुख्य आरोपींना अटक करण्याचे सोपस्कार पार पाडले आहेत. त्यांना किती कडक शिक्षा होणार, हे आजवरच्या अनुभवातून सर्वांनाच ज्ञात आहेच. अर्थात डोंबिवलीतील हा स्फोट अगदी पहिला वगैरे अजिबात नाही तर मागच्या सात ते आठ वर्षांपासून डोंबिवलीत सुरू असलेल्या अशाच लहान–मोठ्या स्फोटांच्या मालिकेतील एक स्फोट आहे. हे वास्तव लक्षात घेतले तर या स्फोटानंतर पुढे सरकार व प्रशासन नागरिकांच्या जीवाची सुरक्षितता जपण्यासाठी किती कसोशीने व प्रामाणिकपणे कारवाई करणार याची कल्पना येते. अगदी पुरावाच द्यायचा तर याच डोंबिवलीतील आठ वर्षांपूर्वी प्रोबेस कंपनीत घडलेल्या दुर्घटनेचे उदाहरण देता येईल. प्रोबेस दुर्घटनेनंतर डोंबिवलीतील धोकादायक रासायनिक कारखाने पाताळगंगा येथे वेगळा केमिकल झोन बनवून हलविण्याचा निर्णय उद्योगमंत्री असणाऱ्या सुभाष देसाई यांनी घेतला होता. मात्र, ताजी घटना घडेपर्यंत याबाबत काहीही झाले नाही. आता पुन्हा अशा धोकादायक कंपन्या शहरापासून दूर हलविण्याची चर्चा सुरू झाली आहे व विद्यमान कार्यक्षम मुख्यमंत्र्यांनी असे उद्योग शहरापासून लांब हलविले जातील, अशी घोषणाही केली आहे. मात्र, जेव्हा डोंबिवली एमआयडीसीमध्ये हे रासायनिक उद्योग उभे राहिले तेव्हा ही एमआयडीसी नागरी वस्तीपासून दूरच होती मग आता या एमआयडीसीत कारखान्यांना विळखा घालून निवासी इमारती एवढेच नव्हे तर शाळा, रुग्णालये उभी कशी राहिली? 'बफर झोन'चा नियम धाब्यावर बसवणाऱ्या या अतिक्रमणांवर व अवैध बांधकामावर प्रशासनाने जो अंकुश ठेवायला हवा तो का ठेवला गेला नाही. यासाठी दोषी कोण? कुणाच्या आशीर्वादाने या नागरी वस्त्या एमआयडीसीला जाऊन खेटल्या? स्फोटानंतर कंपनीच्या मालकांना आरोपी ठरवून अटक करणे हा कारवाईचा रुटीन भाग मात्र, जसे कंपनीच्या मालकांनी कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केले तसेच प्रशासनात व सरकारमध्ये बसलेल्यांनीही एमआयडीसीला जाऊन खेटलेल्या बेकायदा नागरी वस्त्यांकडे दुर्लक्ष केले. हे ही कर्तव्यात कसूर करणेच आहे. व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणारे आहे. मग अशा दोषी अधिकाऱ्यांवर व त्यांना अशी डोळेझाक करण्यास भाग पाडणाऱ्या राज्यकर्ते वा लोकप्रतिनिधी म्हणून मिरवणाऱ्यांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करून त्यांना कडक शिक्षा का होऊ नये? असे घडले तरच सरकार घडलेल्या घटनेबाबत खरोखरच गंभीर आहे याची सामान्यांना खात्री पटेल. मात्र, याच घटनेनंतर नव्हे तर आजवर राज्यात घडलेल्या कुठल्याही घटनेत अशी काही कारवाई झाल्याचा सुखद अनुभव नागरिकांना कधी आलेलाच नाही. मग अशा दुर्घटना थांबणार तरी कशा? हा यक्ष प्रश्न आहे. अशा घटना घडल्या की सर्वपक्षीय नेते आणि विशेषत: राज्यकर्त्यांना सामान्यांबाबत एकच उमाळा येतो. त्यांच्या वक्तव्यातून सामान्यांबाबतच्या चिंतेचे झरे फुटतात. भरपाईचे आदेश भराभर सुटतात व जीव गमावून बसलेल्या सामान्यांच्या जीवाचे चार–पाच लाखांचे मोल करून राज्यकर्ते कर्तव्य पार पाडल्याच्या भावनेने तृप्त होतात. प्रकरण ताजे असेपर्यंत चौकशी समित्या नेमण्याच्या, कठोर कारवाई करण्याच्या, योग्य उपाययोजना करण्याच्या घोषणांचा पाऊस पाडला जातो आणि प्रकरण एकदाचे मागे पडले की, मग सगळे काही बासनात गुंडाळून ठेवले जाते. याच डोंबिवलीतील प्रोबेस स्फोटानंतर सरकारने तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांची चौकशी समिती नियुक्त केली होती. मात्र, आठ वर्षे उलटून गेली तरी सरकारने अद्याप या चौकशी समितीचा अहवाल, निष्कर्ष जाहीर केलेला नाही. हीच सर्वपक्षीय राज्यकर्त्यांची सर्वांत प्रिय पद्धत आहे. राज्यात सर्वत्र आजवर हेच घडत आले आहे आणि त्यातूनच औद्योगिक वसाहतींमधील दुर्घटनांचे प्रमाण वाढतच चालले आहे. कोकणातील औद्योगिक वसाहती असोत की, मुंबई, पुणे, नागपूर, संभाजीनगर या महानगरांमधील औद्योगिक वसाहती असोत तीन–चार महिन्यांत एक तरी दुर्घटना घडल्याचे वृत्त हमखास येतेच. नजीकच्या काळात तारापूर, सुपे, सिन्नर तालुक्यातील मुसळगाव, रांजणगाव, बुटीबोरी, हिंगणा अशा अनेक औद्योगिक वसाहतींमध्ये वारंवार अपघाताच्या घटना घडतच आहेत. तरीही सरकार, प्रशासन त्याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही हे दुर्दैवाचे असून पुढल्या घटनेला निमंत्रण देणारे आहे.

## बीडची कन्या अन्वी जोगदंड हिने कराटे मध्ये पटकावले सुवर्णपदक

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बीड शहर पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी महेश जोगदंड यांची कन्या तथा सेन्टेन्स शाळेची विद्यार्थिनी अन्वी जोगदंड हिने दिनांक २५ व २६ मे २०२४ रोजी नेपाळ देशाची राजधानी काठमांडू येथे पार पडलेल्या दहा देशांच्या स्पर्धेत कराटे या खेळात गोल्ड मेडल पटकावले. यामुळे बीड जिल्ह्याच्या मानेत मानाचा तुरा रोवला गेल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून हृदयी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



अन्वी जोगदंड ही शिक्षणासोबतच कराटे खेळात पारंगत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ती कराटे खेळत असून आतापर्यंत तिने या खेळात बरेच पदक व प्रमाणपत्र मिळविले आहे. यंदाही २५ व २६ मे रोजी काठमांडू येथे पार पडलेल्या कराटे स्पर्धेत ती भारताकडून सहभागी झाली होती. तिथेही तिने या खेळात सुवर्णपदक मिळविले आणि आपल्या देशाचा तिरंगा झेंडा शानाने व अभिमानाने फडकवला. या कराटे स्पर्धेमध्ये भारत व नेपाळ सहित एकूण दहा देशातील खेळाडू स्पर्धक सहभागी झाले होते. यातही अन्वीने सुवर्णपदकाची कमाई केल्याने तिच्यावर बीड जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिने यापुढेही अशाच प्रकारे स्वतःसह आपल्या जिल्ह्याचे नाव लौकिक अजून उंचवावे अशा सदिच्छाही व्यक्त केल्या जात आहे. तिने मिळविलेल्या या यशाबद्दल तिचे आई–वडील आरती–महेश जोगदंड, आजी–आजोबा नंदाबाई–अशोक अशोक जोगदंड, काका–काकी ज्योती–मनोज जोगदंड, चाचू–चाची प्रियंका–राजेश जोगदंड यांनीही अभिनंदन करून पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले आहे.

# मासिक पाळी एक अनुभव...

**मासिक पाळी व्यवस्थापन चक्र सुरू होताना झालेली घालमेल आणि चक्र थांबताना होणारी घालणारी अत्यंत वेदनादायी आहे हे हळूहळू लक्षात येते. परंतु त्या कुटुंबातील पुरुष मानसिकतेला मात्र याची जाणीव होत नाही हे नेमकं काय चाललंय हे कळायच्या आत काहीतरी बोलून किंवा रागावून मोकळे होऊन जातात परंतु या चक्राचा आपण एक भाग आहोत ही मानसिकता पुरुषांमध्ये अजूनही आली नाही त्यामुळे मासिक पाळी सुरू झालेली मुलगी आणि मासिक पाळी जात असलेली पत्नी अशा दोन्ही भूमिकेतून प्रत्येक पुरुषाने समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.**

**मासिक पाळी व्यवस्थापन हा प्रत्येक मुलीच बालपण सोडून तारुण्याकडे निघण्याचा प्रवास आहे. प्रत्येक मुलीमध्ये बाईपण व आईपण येण्याचा सुखद प्रवासाचे चक्र म्हणजेच मासिक पाळी निसर्गाने अप्रतिम अशा काही गोष्टी आपल्याला दिलेले आहेत परंतु त्यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानवी जीवनातील उत्पत्ती किंवा मानवी जीवन उदयास येणे या प्रक्रियेला निसर्गाने देखील भरभरून दिले आहे.**

हे चक्रच अस्तित्वात नसतं तर कदाचित पृथ्वीतलावर मानवाची निर्मिती आणि नंतर मानवनिर्मित असे दोन्ही चक्र कधीच दिसले नसते मासिक पाळी व्यवस्थापन या विषयाबाबत पूर्वीपासून फारसे कुणी बोलताना चर्चा करताना आढळत नाही अत्यंत गोपनीय पद्धतीने सांकेतिक भाषेत हा विषय सांगितला जातो ज्यांना कळतं ते खूप हुशार आणि ज्यांना काही कळत नाही ते मात्र बुद्धू त्यांना मात्र अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

मुळात हा विषय केवळ स्त्रियांचा म्हणजेच ''ती''. चा आहे असं सांगितलं जातं बर ज्यांचा हा विषय आहे ''ती '' सुद्धा अत्यंत गोपनीय पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न करते आणि एकदा कळलं तर ठीक नाहीतर हा विषय तसा नियमितपणे झाकून ठेवला जातो.

अनेक धर्मांमध्ये किंवा बहुतांश कुटुंब व्यवस्थेमध्ये मासिक पाळीला तसे काही विशेष चांगलं म्हणून सांगितलं जात नाही. तर काही धर्मांमध्ये या मासिक पाळी ची अडचण नसते नव्याने मासिक पाळी आलेल्या मुलीला एक तर गोंधळून टाकणारी अवस्था आणि त्यात पुन्हा जो काही प्रश्न येईल त्याला नीट उत्तर मिळत नाही हाच खरा मोठा प्रश्न.

मात्र शासनाच्या या उपक्रमात या विषयाची जनजागृती करण्यासंबंधीची संधी मिळाली आणि युनिसेफ या संस्थेसोबत काम करताना मासिक पाळी व्यवस्थापन, घ्यावयाची काळजी, सुरक्षित पॅड किंवा कपड्याबाबत असलेली माहिती, शिवाय वापरलेले पॅड व कपड्याबाबत काय करावे याबाबतची जनजागृती कशाप्रकारे असावी हे काम करण्याची संधी पुरुष म्हणून आम्हा ३४ जिल्ह्यांच्या कर्मचाऱ्यांवर ती पडली (त्यात काही मोजक्या महिलाही होत्या) ''तो'' पॅड किंवा कपडा हातात घेऊन पाहिला

**जागतिक मासिक पाळी व्यवस्थापन दिनानिमित्त**

त्याचा स्पर्श झाला अन्? हळू हळू परिस्थितीची जाणीव झाली. पाळी येते म्हणजे नेमक काय होत ? ती मानसिकता हे समजून घेताना मात्र बराच वेळ लागला . एखादी समस्या असते आणि ती सोडवण्यासाठी किंवा त्यातून बाहेर पडण्याच्या साठी चाललेली धडपड म्हणजेच सुरक्षित पद्धती निर्माण करताना मुळात ही मासिक पाळी आमच्या सोबत असलेल्या सर्वांनी अगोदर अनुभवली असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही कारण त्यानंतरच जनजागृतीचा हा विषय प्रत्यक्षात आणताना तो सहजपणे येत गेला मासिक पाळी बाबत पोस्टर किंवा माहिती पुस्तिका तयार करताना त्यातील चित्रे त्यातील मजकूर त्यातून निघणारा अर्थ सहज सोपी भाषा या सगळ्या बाबी पाहताना मात्र पुरुष असण्याचे स्वातंत्र्य आपण किती बेदरकारपणे उपभोगतोय याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. पॅडमॅन सारखे चित्रपट पाहिली जातात शिवाय छोट्या छोट्या लघु चित्रपटातून हा विषय आता हळुवारपणे मांडला जातोय परंतु जोपर्यंत वयात आलेला मुलगा हा स्वतः पॅडमॅन होत नाही तोपर्यंत त्या कुटुंबातील स्त्री किंवा मुली यांची मानसिकता तो समजू शकत नाही आणि हेच खरं मोठ आव्हान उभ आहे.

मासिक पाळी येणे म्हणजे बालपणाचा प्रवास संपतो आणि त्याचा उत्सव प्रत्येक कुटुंबामध्ये केला जातो नवीन कपडे किंवा पूजाआर्चा केली जाते. आयुष्यभर या चक्रात आपल्याला राहायचं आहे ही मानसिकता तयार करायला या कुटुंबातील एखादी व्यक्ती जमेल त्या पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न करते.

शिवाय वयाच्या ४० नंतर ही पाळी किंवा मासिक चक्र थांबण्याच्या अगोदर चाललेली घालमेल बदलणारे मानसिक ताण तणाव, शरीरात होणारे बदल, अत्यंत संवेदनशील होणाऱ्या मन, शरीराची साथ या सर्व प्रक्रिया अत्यंत किचकट झालेल्या दिसतात.

मासिक पाळी व्यवस्थापन चक्र सुरू होताना झालेली घालमेल आणि चक्र थांबताना होणारी घालणारी अत्यंत वेदनादायी आहे हे हळूहळू लक्षात येते. परंतु त्या कुटुंबातील पुरुष मानसिकतेला मात्र याची जाणीव होत नाही हे नेमकं काय चाललंय हे कळायच्या आत काहीतरी बोलून किंवा रागावून मोकळे होऊन जातात परंतु या चक्राचा आपण एक भाग आहोत ही मानसिकता पुरुषांमध्ये अजूनही आली नाही त्यामुळे मासिक पाळी सुरू झालेली मुलगी आणि मासिक पाळी जात असलेली पत्नी अशा दोन्ही भूमिकेतून प्रत्येक पुरुषाने समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

शरीरात होणारे बदल हे दीर्घकाळ मानसिक स्वास्थ बिघडवून किंवा त्यावर परिणाम करणारे घटक निर्माण करतात आणि या घटकांमुळे किंवा शरीरात होणाऱ्या बदलांमुळे वर्तणुकीत बदल होतो आणि हा वर्तन बदल जर वेळेत कळला नाही तर त्याचे कौटुंबिक वादात किंवा अडचणीत परिवर्तन होते त्यामुळे अश्या परिस्थितीत नेमक काय करायचं आहे याची जाणीव प्रत्येकाला होणं गरजेचं आहे.

**संजय तुकाराम मिसाळ**
जिल्हा पाणी व स्वच्छता
मिशन जि.प.बीड

## साक्षाळपिंप्री विद्यालयाचा १० वी चा निकाल ९७.०३ टक्के

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

**शालांत प्रमाणपत्र परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९७.०३ टक्के एवढा लागला असून या शाळेने निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.**



साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून १० वीच्या परिक्षेत १३५ पैकी १३१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेचा शेकडा निकाल ९७.०३ टक्के एवढा लागला असून यात विशेष प्राविण्यासह १०५, प्रथम श्रेणीत १९ तर द्वितीय श्रेणीत ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यात शाळेतून गुणानुक्रमे प्रथम गवते पृथ्वीराज पांडूरंग ९५.८०, द्वितीय शेळके यश रामेश्वर ९५.६० टक्के, तृतीय भिसे साक्षी गोरक्षनाथ ९४.४० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पवळ, पर्यवेक्षक जनार्धन काळे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## १०वी परीक्षेत अनाम सौदागर ही १०० टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील सिद्धेश्वर विद्यालयात शिक्षण घेणारी अनाम आ. बाखी सौदागर ही शंभर टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण झाली असेल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.**



या विषयाची माहिती डॉक्टर मुजिब सौदागर यांची पुतणी बाखी सौदागर यांची मुलगी आनाम हिस मराठी विषयात ९५, संस्कृत विषयात १००, गणित विषयात ९७, सायन्स व टेक्नॉलॉजी विषयात ९६ मार्क मिळाले असून एकूण गुण ४८५+१५ असे ५०० मार्क मिळाले आहे त्याच्यामुळे तीचे सर्वत्र अभिनंदन होत असून राष्ट्रवादी काँग्रेसचे कचरू तात्या खळगे पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरे कर, जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, पत्रकार महेंद्र मस्के, ज्योतीराम पांढरपोटे, अरविंद ओव्हाळ, विष्णू उगले, जाकेर पटेल, शहाजी टमके, चांद बनातवाला, राम किसन, प्रदीप कर्डिले यांनी अभिनंदन केले आहे

## दिंद्रुड पोलिसांचे शांततेचे आवाहन

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**येत्या ४ जून रोजी असलेल्या लोकसभेच्या निकाला संदर्भात दिंद्रुड पोलीस हद्दीतील गावात शांततेचे आवाहन दिंद्रुड पोलिसांच्या वतीने करण्यात आले.**



दिंद्रुड येथील महादेव मंदिर परिसरात सोमवारी सायंकाळी सात वाजे दरम्यान दिंद्रुड ग्रामस्थांशी दिंद्रुड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर धोत्रे,राजेभाऊ राठोड, बीट अंमलदार सुभाष पवार यांनी संवाद साधत निकाला दिवशी ग्रामस्थांनी कायदा व सुव्यवस्था याबाबत कुठलाही प्रश्न निर्माण होणार नाही, सर्वांनी शांतता राखत, सोशल मीडियावर पसरलेल्या अफवांचा कुठेही अतिरेक होऊ नये याबाबत खबरदारी घेण्याचे आवाहन केले. गेल्या काही दिवसात सोशल मीडियाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेला तडा जाण्याच्या घटना घडत आहेत. ४ जून रोजी निकालानंतर काही अनुचित प्रकार होऊ नये याकरिता जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये पोलीस यंत्रणा आता कामाला लागली आहे. याच अनुषंगाने ठीक ठिकाणी कॉर्नर बैठकांचे आयोजन दिंद्रुड पोलीस स्टेशनच्या माध्यमातून करण्यात येत आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सपोनि अण्णाराव खोडेवाड यांनी माध्यमांद्वारे केली आहे.

## पान १वरून...

### महाराष्ट्रात १० जूनला

सध्या मान्सून प्रगतीपथावर आहे. शनिवारी बंगालच्या उपसागराचे निम्मे क्षेत्र तसेच श्रीलंकेचा भुभागही दोन हिस्याने काबीज केला असल्याची माहिती माणिकराव खुळे यांनी दिली. मान्सूनची बंगाल शाखा कदाचित लवकरही सक्रिय होवु शकते. तसे झाल्यास सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी लगतच्या जिल्ह्यात, मध्य महाराष्ट्र व खान्देशपेक्षा मान्सूनचे आगमन तेथे कदाचित अगोदरही होवु शकते. असे ते म्हणाले. अर्थात हे सर्व जूनच्या पहिल्या आठवड्यातील मान्सूनच्या घडामोडीवर अवलंबून असेल असे माणिकराव खुळे म्हणाले. बंगालच्या उपसागरात तयार झालेले अतितीव्र स्वरुपातील ' रेमल ' नावाचे चक्रीवादळ सोमवार २६ मे ला मध्य रात्रीला ताशी १३० ते १३५ किमी. चक्रकार वारा वेगाने बांगलादेश किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. मान्सून वाटचालीवर तसेच महाराष्ट्रात चालू असलेल्या उष्णता लाट सदृश्य स्थितीवर त्याचा कोणताही विपरीत परिणाम जाणवणार नाही, असे खुळे म्हणाले. आशियाई देशांनी एकत्रित येऊन त्यांच्या प्रादेशिक भाषेत चक्रीवादळ संबंधी सुचवलेली नावे व बनवलेली यादीनुसार आता येणाऱ्या चक्री वादळासाठी ओमान देशाने सुचवलेल्या 'रेमल' नाव येत आहे. म्हणून या पूर्वमोसमी हंगामातील चक्रीवादळाला 'रेमल' नांव दिले आहे. अरेबिक भाषेतील त्याचा अर्थ 'वाळू' किंवा 'रेती' होतो.

------------

### सगे सोयरेबद्दलचा निर्णय

या निवडणुकीच्या माध्यमातून आम्ही मैदानामध्ये आहोत. ओबीसी बहुजन पार्टी निवडणुकीत उतरली आहे. ही निवडणूक कमी वेळामध्ये साधनं आणि आर्थिक मदत नसताना आम्ही एवढा मोठा प्रमाणात ही निवडणूक लढलो. जय आणि पराजयाची आम्हाला चिंता नाही. किंवा त्याचा पर्वाही नाही. येणारी विधानसभा निवडणूक मात्र पूर्ण ताकतीने लढणार आहोत. उद्या आमची कार्यकारणीची बैठक आहे, त्यामध्ये येणाऱ्या विधानसभा निवडणुकीला कशा पद्धतीने समोर जायचे, याची रणनीती ठरणार आहे. पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, ओबीसींच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर जिल्ह्याजिल्ह्यामध्ये शासनाच्या विरोधात आंदोलन करून या ठिकाणी प्रचंड मोठा उद्रेक होईल. त्यातून जे काय परिणाम होतील सर्व जबाबदारी महाराष्ट्र सरकारवर असेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

------------

### बोगस मतदानाचे व्हिडीओ

लक्ष लागले आहे. बीडमधील बोगस मतदानाचे व्हिडीओ सोशल मीडियामध्ये मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने थेट निवडणूक आयोगाकडेच या व्हिडीओचा पुरावा देत बीड जिल्ह्यात कशाप्रकारे बोगस मतदान झाले हे दाखवून दिले. कुठे मतदान कर्मचाऱ्यांना दमदाटी केली जातेय तर कुठे मतदारावर दबाव टाकला जात असल्याचे यातून दिसत आहे. याच बोगस मतदानाची आधी रोहित पवार यांनी, त्या नंतर स्वतः शरद पवार यांनी सुद्धा तक्रार करत बीड जिल्ह्यात फेरमतदान घेण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे १३ तारखेला मतदान झाल्यानंतर त्याच रात्री बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी निवडणूक आयोगाकडे २२ गावांमध्ये बोगस मतदान झाल्याचा आरोप केला होता. त्यामुळे आता निवडणुक आयोग या वादग्रस्त गावांबाबत काय निर्णय घेते, याकडे आता लक्ष लागले आहे.

------------

### राज्यात उष्माघाताचे

सांगली जिल्ह्यात प्रत्येकी एक रुग्ण, रायगड, वासीम, बीडमध्ये प्रत्येकी दोन रुग्ण, अमरावती, अहमदनगर, छत्रपती संभाजी नगरमध्ये प्रत्येकी तीन रुग्ण, जळगाव आणि अकोला येथे ५ रुग्ण रुग्ण आढळले आहेत. तसेच गडचिरोली, गोंदिया, कोल्हापूर, ठाणे, वर्धा येथे प्रत्येकी सहा आणि पुण्यात आठ रुग्ण आढळले आहेत. मुंबई शहर आणि उपनगरात उष्माघाताचा एकही रुग्ण आढळलेला नाही.

------------

### दहावीचा निकाल उद्या

https://mahresult.nic.in
http://sscresult.mkcl.org
https://sscresult.mahahsscboard.in
https://results.digilocker.gov.in
https://results.targetpublications.org

१० वीच्या विद्यार्थ्यांना स्वतःला मिळालेले गुण तर पाहता येणारच आहेत. त्याशिवाय डिजी लॉकरच्या सुविधेमुळे गुणपत्रिकाही संग्रहीत करता येणार आहे. याशिवाय मिळालेल्या गुणांबाबत काही शंका असल्यास गुणपडताळणी करण्यासाठी २८ ते ११ जून या कालावधीत ऑनलाईन शुल्क भरून त्यासाठी अर्ज भरता येणार आहेत.

----------

### सहाव्या टप्प्यात मतांचा

६, झारखंडमधील ४ जागा आणि जम्मू आणि काश्मीर मधील एका जागेसाठी मतदान झाले. मतदानाच्या सहाव्या टप्प्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उप राष्ट्रपती जगदीप धनखर, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, भाजप नेते मनोज तिवारी, हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर, सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी वड्रा यांच्यासह अनेक प्रमुख व्यक्तींनी मतदान प्रक्रियेत भाग घेऊन आपला मतदानाचा हक्क बजावला.

**मतदान टक्केवारी पुढीप्रमाणे :**

बिहार– ५२.२४, हरियाणा– ५५.९३, जम्मू काश्मीर– ५१.३५, दिल्ली– ५३.७३ टक्के, ओडिशा ५९.६ टक्के, उत्तर प्रदेश ५२.०२ टक्के, पश्चिम बंगाल– ७७.९९ टक्के आणि झारखंडमध्ये ६१.४१.

------------

### निवडणूक आयोगाकडून ५ टप्प्यातील

वातावरण बिघडवण्याचा डाव असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले असून, सर्वोच्च न्यायालयाची निरीक्षणे आणि निर्णय यामुळे निवडणूक प्रक्रियेला बळ मिळाले आहे. यामुळे आयोगाला कोणत्याही दबावाशिवाय लोकशाही प्रक्रियेचे पालन करण्याची जबाबदारीची जाणीव होते. त्यामुळे प्रत्येक मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या पारदर्शक पद्धतीने सार्वजनिक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. पारदर्शक व्यवस्थेबाबत अधिक स्पष्टीकरण देताना आयोगाने म्हटले आहे की, मतदान केंद्रावर पडलेल्या एकूण मतांची अंतिम यादी उमेदवारांना दिली जाते. अधिकृत एजंटांकडे देशातील सर्व ५४३ संसदीय मतदारसंघांमधील प्रत्येकी १०.५ लाख बूथसाठी विशिष्ट फॉर्म १७ सी आहे. एजंटना मतदान केंद्रांपासून स्ट्राँग रूममध्ये स्टोरेजपर्यंत इव्हिएम आणि फॉर्म १७ सी सह वैधानिक कागदपत्रे घेऊन जाण्याची परवानगी आहे. आयोगाने विनंती केली आहे की उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी फॉर्म १७ ची प्रत घेऊन मतमोजणी केंद्रात यावे आणि प्रत्येक फेरीत मोजण्यात आलेल्या मतांची पूर्तता करावी. मतदानाच्या टक्केवारीतही कोणताही बदल झालेला नाही.

------------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## सावरकर जयंती निमित्त माजलगावात आज रंगणार अनादी मी...अनंत मी...

### गजानन महाराज मंदिरात सावरकरांचे संगीत स्मरण

**माजलगाव । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती निमित्त समस्त ब्राह्मण समाज आयोजित अनादी मी अनंत मी संगीत स्मरणाचा भव्य असा कार्यक्रम शहरातील गजानन मंदिरात सायंकाळी ६ वाजता पार पडणार आहे.

माजलगाव शहरातील समस्त ब्राह्मण समाजातर्फे स्वा.विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती निमित्त संगीत स्मरण आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.आज रोजी शहरातील गजानन मंदिराच्या सभागृहात सदरील संगीत स्मरण सायकली ६ वाजता होणार आहे यामध्ये स्वा.सावरकर यांच्या असीम प्रतिभेतून साकारलेल्या गीतांचा सुरेल असा आविष्कार संजय कुलकर्णी,ऍड.श्रीराम देशपांडे, कुणाल कुलकर्णी, चैतन्य आहेर यांच्या निर्मितीतुन अंकुश साबळे,सुबोध देशपांडे,ओंकार मोगरेकर,अन्वी जाधव,श्रेया ठोगे,सायली जवलेकर, मृदुला नवशिंदें,पूर्वा भिलेगावकर यांचा चमू सादरीकरण करणार आहे.त्याचबरोबर २ जून रोजी योगेश महाराज साळेगावकर यांचे व्याख्यान देखील आयोजित करण्यात आले आहे.संगीत स्मरण आणि व्यख्यानाच्या कार्यक्रमाला सर्व सामाजिक घटकांनी उपस्थिती राहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# आ.संदीप क्षीरसागरांकडून वादळी-वारा, पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी





## पंचनामे करून मदत जाहीर करण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

वादळी-वारा व अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील गावांमध्ये जाऊन पाहणी केली. तसेच झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहीर करा अशी मागणी प्रशासनाकडे केली.

गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात विविध ठिकाणी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले आहे. या अनुषंगाने बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील नुकसानग्रस्त ग्रामीण भागात विविध ठिकाणी भेट दिली. या अवकाळी पावसामुळे शेतीचे तसेच नागरिकांच्या घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना शासनस्तरावरून मदत करण्यासाठी प्रशासनाकडे मागणी केली. दरम्यान संबंधित भागातील रस्त्यांची पाहणीही यावेळी आ.क्षीरसागर यांनी केली.


## महाराणी ताराबाई विद्यालयाची दहावीच्या उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम

**वडवणी । प्रतिनिधी**

राज्य शिक्षण मंडळाचा इयत्ता १० वी चा निकाल घोषित झाला असुन संस्कार शिक्षण मंडळ वडवणी, संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल ९६.९८ % लागला. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी उज्वल यशाच्या निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे.



कु.प्रिया चंदनशिव 482 /96.40 %



कु.मयुरी बारटक्के 475 /95.00 %



कु.खुशी थोरात 473 /94.60 %

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी मार्च- २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवार दि.२७ मे २०२४ रोजी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला. या मध्ये वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीच्या परीक्षेचा ९६.९८ % निकाल लागला आहे. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यालयाने उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम ठेवली ठेवली आहे .महाराणी ताराबाई विद्यालयातून कु.चंदनशिव प्रिया अप्पासाहेब ९६.४०% गुण घेऊन प्रथम क्रमांक आला आहे तर ९५.०० % गुण घेऊनक कु.बारटक्के मयुरी मनोज हीने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे तर कु.थोरात खुशी सुभाषराव ९४.६०% गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे तर ९०.००% च्या पुढे गुण घेऊन पास होणारे विद्यार्थी ११ आहेत तर विशेष प्राविण्य घेऊन उत्तीर्ण होणारे विद्यार्थी संख्या ११४ तसेच प्रथम श्रेणी ९७ व द्वितीय श्रेणी ३९ तर पास झालेले विद्यार्थी ७ आहेत. या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच विद्यालयाच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय भाऊ आंधळे, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रंजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे व विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर, उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,श्री.ठोंबरे सर,श्री.धस सर, श्री.कुलकर्णी सर,श्री.चोले सर,श्री.घोळवे सर,श्रीमती फलके मॅडम,श्रीमती घुले मॅडम यांच्यासह विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी,पालक व मार्गदर्शक शिक्षक-शिक्षिकांचे कौतुक करून अभिनंदन केले व सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## भागुजीराव ढेकळे विद्यालयाचा १० वी चा निकाल ९८.३१ टक्के

**गेवराई । प्रतिनिधी**

शालांत प्रमाणपत्र परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९८.६१ टक्के एवढा लागला असून या शाळेने निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून १० वीच्या परिक्षेत १७८ पैकी १७५ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेचा शेकडा निकाल ९८.३१ टक्के इतका लागला असून यात गुणानुक्रमे प्रथम कु. शिंदे रूद्रप्रताप संतोष ९६.६०, द्वितीय कु.शिंदे आदिती श्रीकृष्ण गणेश ९६.०० टक्के, तृतीय कु.काळे प्रगती श्रीराम ९४.००, कु.लोखंडे हर्षदा जालिंदर ९४.०० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य आण्णासाहेब थिटे, पर्यवेक्षक रावसाहेब भोसले, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## मानव विकास मूकबधीर विद्यालयाचा इयत्ता १० वीचा निकाल १०० टक्के

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील दिव्यांग क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केलेल्या अंबाजोगाई येथील मानव विकास निवासी मूकबधीर विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४ चा १००% निकाल लागला असून, गेल्या सतत २२ व्या वर्षी सुध्दा १००% निकाल देऊन विद्यालयाने शैक्षणिक यशाची परंपरा कायम ठेवली आहे. मानव विकास मूकबधीर विद्यालयात एकूण १२ विद्यार्थी परीक्षेला होते. त्यात ओंकार बुद्रुक, राहूल राठोड (७७.२०%) व चि. रोहन कांबळे (७६.४०%), संतोष कांबळे (७६.००%) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला आहे. सर्व विद्यार्थ्यापैकी सात विद्यार्थी विशेष प्रावीण्य व पाच विद्यार्थी हे प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

### विद्यार्थ्यांचे परिश्रम, जिद्द व शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच १००% निकालाचे सातत्य-संस्थापक सचिव राजकिशोर मोदी

विद्यालयामार्फत आजपर्यंत २८३ मूकबधीर विद्यार्थी इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेले आहेत. मूकबधीर विद्यार्थ्यांना शैक्षणिक व सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी सातत्यपूर्ण योगदान संस्थेने दिलेले आहे. विद्यार्थ्यांचे परिश्रम व जिद्द आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच १०० % निकालाचे सातत्य - राजकिशोर मोदी समाजातील उपेक्षीत दिव्यांग घटकांना शिक्षण देऊन त्यांना स्वत:च्या पायावर उभे रहावे यासाठी मानव विकास मूकबधिर विद्यालय कार्यरत आहे. विद्यालयातील कर्णबधिर विद्यार्थ्यांचे परिश्रम, जिद्द व शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच १०० % निकालाचे सातत्य टिकुन आहे. विद्यालयाचे नाव सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे. विद्यालयाच्या यशामुळे संस्थेचे नाव राज्यस्तरावर उज्वल होत असल्याचा मनापासून आनंद होत असल्याची भावना राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी संस्थेमार्फत आम्ही प्रयत्नशील राहू असेही संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी आवर्जून नमूद केले. मूकबधीर विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक आनंद टाकळकर, विशेष शिक्षक व विभाग प्रमुख दिलीप साठे, सी. के. बडे, डी. बी. शिंदे, एन. व्ही. बारस्कर, व्ही.एम. पंडीत, व्ही. एस. पवार मॅडम, बी. ए. नांदुरकर यांनी मार्गदर्शन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, अध्यक्ष भूषण मोदी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी रविंद्रजी शिंदे साहेब, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता अंकुशराव नखाते साहेब, संस्थेचे मार्गदर्शक डॉ. डी. एच. थोरात सर, प्रा. वसंतराव चव्हाण सर, प्रा. डॉ. बी. आय. खडकभावी सर, दिनकर जोशी सर, सुरेश मोदी, मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.के. चव्हाण, अपंग विद्यालयाचे मुख्याध्यापक आय.पी. लोढा, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सी.व्ही. गायकवाड सर, बी. फार्मसी चे प्राचार्य डॉ.संतोष तरके सर, न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य रेंजू आर. चंद्रन सर, समन्वयक विनायक मुंजे सर, घाटनागनाथ प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. अंजली जोशी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## हार्मीका बालाजी जगतकर हिचे दहावी बोर्ड परिक्षेत उत्तुंग यश

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

तुलसी इंग्लिश स्कुल बीडची विद्यार्थिनी कु.हार्मीका बालाजी जगतकर हिने राज्य माध्यमिक शालांत परिक्षेत ९१.८० टक्के गुण घेवून प्रथमश्रेणीत येण्याचा बहुमान मिळविला आहे. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल तिचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.



कु.हार्मीका बालाजी जगतकर हिने इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेमध्ये ९१.८०% गुण घेऊन उत्तुंग यश संपादित केले आहे. कु.हार्मिका ही तुलसी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या सौ.उमाताई जगतकर व बीड अक्षरधामचं संपादक प्रा.बालाजी जगतकर यांची कन्या आहे.कु.हार्मिका हिने अथक परिश्रम सातत्यपूर्ण अभ्यास करून घरीच अभ्यास करून हे यश संपादन केले आहे.कु. हार्मिका ही खूप गुणवान असून लहानपणापासून विविध स्पर्धा परिक्षेतही तिने यश संपादन केले आहे. कु.हार्मिका हिने इंग्लिश विषयात ७१, मराठी ८४, हिंदी ८४, गणित ९३, सोशल ॲण्ड टेक्नॉलॉजी ९५, सोशल सायन्स या विषयात ८८ मार्क असे ५०० पैकी ४४४ मार्क घेतले आहेत. तिच्या या यशाबद्दल तुलसी इंग्लिश स्कुलच्या प्राचार्या, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पत्रकार बांधवांनी अभिनंदन केले आहे.

## इंदिरा गांधी कन्या शाळेचा ९९% निकाल

दिंद्रुड प्रतिनिधी :-

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील शार्दूलेश्वर शिक्षण संस्थेच्या इंदिरा गांधी कन्या







माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दिंद्रूडचा महाराष्ट्र शालांत परीक्षेचा निकाल सोमवारी ९९.०७% लागला आहे. परीक्षेला बसलेले १०७ विद्यार्थिनींपैकी सर्व विद्यार्थिनी या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत उत्तीर्ण झाल्या.

इंदिरा गांधी कन्या शाळेच्या १०८ विद्यार्थिनींपैकी १०७ विद्यार्थीनींनी इयत्ता दहावीची परीक्षा दिली.विशेष प्राविण्य ६३, प्रथम श्रेणी ३६,द्वितिय श्रेणी ७, तृतीय श्रेणी १ ने उत्तिर्ण झाल्या आहेत. कु.गाडेकर पूजा हिने ९४ % गुण मिळवत विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला तर कु पांचाळ अंकीता हीने ९३.८०% व कु.आरसूळ साक्षी हिने पण ९३.८० % गुण घेत द्वितीय आणि कु.पांचाळ कोमल ही ९२.४० % गुण घेऊन तृतीय आली आहे. विद्यालयातील यशस्वी विद्यार्थीनींचे शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी माजी आमदार मोहनराव सोळंके,सचिव सोळंके आर. व्हि. मुख्याध्यापक श्री बोचरे ए व्हि, प्राध्यापक,शिक्षक,शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी, उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

### शैलेश पदमुले प्रथम, अपर्णा शिंदे द्वितीय तर आर्यन गोरे तृतीय

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनींनी घवघवीत यश मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल केले. या मध्ये चि. शैलेश पदमुले याने ९४.२० टक्के गुण घेऊन शाळेतून प्रथम कु. अपर्णा शिंदे हिने ९२.०० गुण घेऊन द्वितीय तर चि.आर्यन गोरे याने ८८.६० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे.

शाळेच्या सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ मॅडम, सचिव श्री. गोविंदराव वाघ साहेब शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षकवृंद पालक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्य शुभेच्छा दिल्या. याबाबत अधिक माहिती अशी की मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल आज दि. २७ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला. या मध्ये बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा ९५ टक्के निकाल लागला आहे.

या शाळेने दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली. यामध्ये चि. शैलेश पदमुले याने ९४.२० टक्के गुण घेऊन शाळेतुन प्रथम क्रमांक मिळविला. कु. अपर्णा शिंदे हिने ९२.०० गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला तर चि. आर्यन गोरे याने ८८.६० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांसह इतर दहावी बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून यशाची परंपरा कायम ठेवली. त्याचबरोबर शाळेतील बहुतांश विद्यार्थ्यांना ८५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.

त्याबद्दल सर्व दहावी बोर्ड परीक्षेतील यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकवृंदाचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ सुदामतीताई वाघ मॅडम, सचिव श्री. गोविंदराव वाघ साहेब शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण सर, श्री आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम श्रीमती साळुंके मॅडम , श्रीमती सानप मॅडम, श्री गणेश गुजर सर, सचिन यादव, वचिष्ट शिंदे, तान्हाजी मोरे, बाबाराम थोरात यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरिक आणि पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पान ६ वरून...

### श्रीमती साखरबाई विष्णुपंत

राज्याचे नाव सुवर्ण अक्षराने लिहिलं जावं यासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या विभूतींना तर दरवर्षी पुरस्काराने सन्मानित करण्यात येतात परंतु त्यांच्या या अफाट यशाच्या पाठीमागे एक अदृश्य शक्ती असते अन ती शक्ती म्हणजे त्यांचे आईवडील... त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून खचून न जाता मोठ्या कष्टाने आपल्या मुलांना सुसंकृत केले, विद्याविभूषित केले, मुलांना शिकवलं अशा किर्तीवंत यशवंत मुलांना घडवणाऱ्या मराठवाड्यातील आदर्श माता- पित्यांचा सन्मान होणं गरजेचं होतं म्हणून मराठवाडा मित्रपरिवार आयोजित एमआयटी कोथरूड येथील संत ज्ञानेश्वर सभागृहात आदर्श माता पिता सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात बोलतांना एमआयटी चे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले की,आपल्या सर्वांच्या जडणघडणी मध्ये आपल्या आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची असते. सद्गुणी पालकांमुळेच या विश्वात एक चांगला माणूस घडतो. राजे शहाजी व माँसाहेब जिजाऊच्या शिकवणीमुळेच छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होऊ झाले. म्हणूनच शहाजी जिजाऊंसारखे पालक व्हा!' असे विचार एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा.कराड यांनी व्यक्त केले. मराठवाडा मित्रपरिवार आयोजित एमआयटी कोथरूड येथील संत ज्ञानेश्वर सभागृहात आदर्श माता पिता सन्मान सोहळ्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा.डॉ.मिलिंद आव्हाड,अँटी करप्शनचे अप्पर पोलीस अधीक्षक विजय चौधरी, माऊली ग्रुप कंपनीचे चेअरमन श्रीकांत शेळके,डायना बायोटेक कंपनीचे चेअरमन डॉ. विनोदकुमार पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच एमआयटी युनिव्हर्सिटीचे संचालक डॉ.महेश थोरवे व डी. एम.व्ही.इंडिया ग्रुपचे चेअरमन दत्ताजी मेहत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### सहकार महर्षी रामकृष्ण

कार्यक्रमाप्रसंगी तालुक्यातील विविध गावचे सरपंच सेवा संस्थेचे चेअरमन संचालक ग्राप सदस्य अनेक सहकारी संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ह भ प रामकृष्ण रंधवे बापू यांनी रामकृष्ण बांगर यांना भेटून शुभेच्छा दिल्या.

## जोधाप्रसादजी मोदी विद्यालयाची पालकर अस्मिता दहावी बोर्डाच्या परीक्षेत ९८% गुण मिळवत शाळेत सर्वप्रथम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता दहावीचा ऑनलाइन निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. बीड जिल्ह्याने विशेषतः अंबाजोगाई शहरातील विद्यार्थ्यांनी यावर्षी देखिल दहावीच्या निकालात सर्वप्रथम येण्याची परंपरा कायम ठेवली असल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देखील आपल्या विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखल्याचे दिसून येत आहे. यावर्षी या विद्यालयाचा एकूण निकाल हा ९६% एवढा लागला आहे.







जोधाप्रसादजी मोदी विद्यालतील अनेक विद्यार्थ्यांनी बोर्डाच्या परीक्षेत विविध विषयात घवघवीत असे यश प्राप्त केले आहे. यामध्ये विशेष प्रविण्यासह २१ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १४ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत १९ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. ज्यामध्ये कु.पालकर अस्मिता श्रीकांत या विद्यार्थिनीने ९८.२०% गुण घेऊन विद्यालयात प्रथम तर कु.पठाण सायमा शादुल्ला हिने ८८.६०% त्याचबरोबर ८८% गुण मिळवत चि. देशमुख समर्थ सखाराम या विद्यार्थ्याने विद्यालयातुन तृतीय क्रमांक मिळवला आहे. जोधाप्रसादजी मोदी विद्यालयातील एकूण ६६ विद्यार्थ्यांपैकी ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्याचबरोबर कु. पालकर अस्मिता श्रीराम या विद्यार्थिनीने इंग्रजी विषयात ९८ गुण तर मराठा विषयात ९५ गुण मिळवले आहेत. तसेच होके पूनम नारायण हिने हिंदी विषयात ९४ गुण तर देशमुख समर्थ सखाराम या विद्यार्थ्याने गणित विषयात ९८ गुण प्राप्त केले आहेत. महाविद्यालयातील सर्व यशवंत व गुणवंत विद्यार्थ्यांना त्याच्या घवघवीत यशाबद्दल संस्थापक राजकिशोर मोदी,प्रा डॉ बी आय खडकभावी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, मार्गदर्शक प्रा. डॉ डी एच थोरात, प्रा. वसंत चव्हाण, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य चंद्रकांत गायकवाड, विभाग प्रमुख मीना सोनवणे, संस्थेचे सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## भैरवनाथ विद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी जायभाय ९४.८०% घेऊन विद्यालयात प्रथम

**अंमळनेर । प्रतिनिधी**

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचालित, भैरवनाथ विद्यालय अमळनेर तालुका पाटोदा जिल्हा बीड येथील विद्यालयाचा निकाल ९४.५४% लागला असून लागला असून गुण क्रमांक खालील प्रमाणे.१) प्रथम विद्यार्थिनी कु. जायभाय साक्षी सावळेराम २)द्वितीय विद्यार्थिनी कुमारी शेळके स्वाती दत्तू.९०% ३)तृतीय ठोंबरे अभिषेक अशोक.८०% गुण घेऊन यशाची परंपरा कायम ठेवली आहे विशेष प्राविण्य मध्ये २३विद्यार्थी. प्रथम श्रेणी २४ विद्यार्थी.द्वितीय श्रेणी ५ विद्यार्थी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब, संस्थेचे संचालक डॉ.अजय दादा धोंडे, प्रशासनाधिकारी डॉ. डी. बी. राऊत सर. प्रा. शिवदास विधाते सर, माऊली बोडखे सर. संजय शेंडे सर, सरपंच सोमनाथ गाडे, मा.सरपंच सतीश नाना पवार केंद्रप्रमुख उकांडे सर, मुख्याध्यापक वैष्णव शिंदे सर, प्राचार्य चौधरी सर ,बनसोडे सर, श्री राहुल निकाळजे सर, श्री रमेश अनारसे सर,



श्रीमती कल्पना देशमुख मॅडम, श्री आबासाहेब पन्हाळकर सर, श्री राजेंद्र कुलांगे सर, श्री सचिन शेळके सर, श्री संतोष मिसाळ सर, श्रीमती शोभा पालवे मॅडम, श्री बालाजी नरेवाड, श्री स्वामीनाथ सानप, श्री रमेश धोंडे, श्री मच्छिंद्र शेंडे, श्रीमती वर्षा खांडेकर,तसेच सर्व गुरुजन, व कर्मचाऱ्यांनी अमळनेर अमळनेर परिसरातील ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# देशात अन्नधान्याचे उत्पादन किती होणार?

## सरकारचे पीकनिहाय उत्पादनाचे उद्दीष्ट ठरले

पुणे : केंद्र सरकारने अन्नधान्य उत्पादनाचे उद्दिष्ट ठरवले आहे. सरकारने २०२४-२५ या पीक वर्षासाठी ३४०.४० दशलक्ष टन अन्नधान्य उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये खरीप हंगामातील १५९.९७ दशलक्ष टन, रब्बी हंगामातील १६४ दशलक्ष टन आणि इतर हंगामातील १६.४३ दशलक्ष टन उत्पादनाचा समावेश आहे. याच पार्श्वभूमीवर सरकारकडून पीकनिहाय उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

तांदूळ, गहू उत्पादनाचे उद्दिष्ट : भारत सरकारने २०२४-२५ या पीक वर्षासाठी ३४०.४० दशलक्ष टन अन्नधान्य उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवले आहे. सरकारी माहितीनुसार, तांदळाचे एकूण उत्पादन १३६.३ दशलक्ष टन, गहू ११५ दशलक्ष टन, डाळीचे २९.९० दशलक्ष टन, तेलबियांचे ४४.७५ दशलक्ष टन आणि धान्यांसह भरडधान्यांचे उत्पादन २.९५ दशलक्ष टन इतके निश्चित करण्यात आले आहे. कडधान्यांमध्ये ४.५० दशलक्ष टन, उडीद ३.०५ दशलक्ष टन, मूग ४.२५ दशलक्ष टन, हरभरा १३.६५ दशलक्ष टन आणि मसूर पिकाचे १.६५ दशलक्ष टन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर खरिपातून ९.५ दशलक्ष टन



आणि रब्बीतून १८.१५ दशलक्ष टन कडधान्ये खरेदी करण्याचे सरकारने नियोजन केले आहे.

मिलेट्स उत्पादनाची आकडेवारी : मिळालेल्या माहितीनुसार, मक्याचे उत्पादन ३८.८५ दशलक्ष टन आणि बार्लीचे २.२५ दशलक्ष टन इतके निर्धारित करण्यात आले आहे. या दोन्ही पिकांमध्ये भरड धान्याचा समावेश होतो.

दुसरीकडे, ज्वारी, बाजरी, नाचणी आणि इतर बाजरीसह श्रीअण्णा उत्पादनाचे लक्ष्य १८.१० दशलक्ष टन आहे, त्यापैकी १४.३७ दशलक्ष टन खरीप हंगामासाठी उद्दिष्ट आहे. तर रब्बीसाठी २.६ दशलक्ष टन आहे. तर कापूस उत्पादनाचे उद्दिष्ट ३५ दशलक्ष गाठींचे आहे.

तेलबियांचे किती उत्पादन करण्याचे उद्दीष्ट?

तुरीच्या डाळीचे ४.५० दशलक्ष टन, उडीद ३.०५ दशलक्ष टन, मूग ४.२५ दशलक्ष टन, हरभरा १३.६५ दशलक्ष टन आणि मसूर पिकाचे १.६५ दशलक्ष टन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. खरिपातून ९.५ दशलक्ष टन आणि रब्बीतून १८.१५ दशलक्ष टन कडधान्ये खरेदी करण्याचे सरकारने नियोजन केले आहे.

याशिवाय खरीप हंगामात २८.३७ दशलक्ष टन आणि रब्बी हंगामात १५.०३ दशलक्ष टन र इतर हंगामात १.३५ दशलक्ष टन तेलबियांचे उत्पादन करण्याचे उद्दिष्ट आहे. तेलबियांमध्ये, मोहरीचे (रब्बी पीक) उत्पादन १३.८ दशलक्ष टन, भुईमूग १०.६५ दशलक्ष टन, सोयाबीन १५.८ दशलक्ष टन असे सरकारचे लक्ष्य आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कापूस उत्पादनाचे उद्दिष्ट १७० किलोच्या ३५ दशलक्ष गाठी ठेवण्यात आलं आहे. तर ४७० दशलक्ष टन उसाचे उत्पादन करण्याचे सरकारचे लक्ष्य आहे.

## शेळीपालनासाठी काठेवाडी शेळी ठरतेय फायदेशीर



शेतीला जोड व्यवसाय म्हणून शेतकरी वर्ग शेळीपालन करत असतो. शेळीपालन करण्यास खर्चही कमी येतो तसेच जागाही कमी लागते. विशेष म्हणजे एका गाईला लागणाऱ्या खाद्यामध्ये जवळपास दहा शेळ्या जगवल्या जाऊ शकतात. मात्र, शेळीपालन म्हटले की अनेक प्रकारच्या शेळ्या येतात, जसे की बिटल शेळी, शिरोही, उस्मानाबादी, तोतापुरी, देशी शेळी असे अनेक प्रकार आहेत. पण कधी काठेवाडी शेळीबद्धल ऐकले आहे का? ही काठेवाडी शेळी, शेळीपालनासाठी फायदेशीर ठरत असल्याचा शेतकऱ्यांचा अनुभव आहे.

काठेवाडी शेळीची वैशिष्ट्ये : आपणास काठेवाडी जातीची शेळी जर पाळायची असेल तर ती तुम्ही आठ ते दहा वर्षाची घेऊन फायदा नाही. कारण या जातीचे निम्मे आयुष्य बंदिस्त गोठ्यामध्येच जाते. जे की तिथून पुढे जर तुम्ही ती शेळी बंदिस्त गोठ्यात ठेवली तर त्याचे आरोग्य बिघडते. कारण काठेवाडी शेळी ही दिवसाला दोन ते अडीच लिटर दुध देते. जर तुम्हाला शेळीपासून जास्त उत्पन्न पाहिजे असेल तर काठेवाडी शेळीची जात सर्वोत्कृष्ट आहे.

किती देते दूध? : काठेवाडी जातीची शेळी दिवसाला दोन ते अडीच लिटरपेक्षा जास्त दूध देते. त्यामुळे त्या दुधातून सुद्धा शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होतो. तसेच शेळीपालन लोकांना वाटते की लवकर करडे मोठी व्हावीत. तसेच जास्त किमतीला विकली जावीत तर यासाठी तुम्ही काठेवाडी शेळीची जात बिनधास्तपणे निवडू शकतात.

काठेवाडी शेळीची काय असते अडचण : बिटल शेळी, उस्मानाबादी जातीची शेळी, शिरोही जातीची शेळी, तोतापुरी जातीची शेळी आणि देशी शेळी अशा अनेक जातींच्या शेळीच्या अंगावर कमी प्रमाणत केस असतात. मात्र, काठेवाडी जातीच्या शेळीच्या अंगावर खूप केस असतात. अर्थात काठेवाडी शेळी ही केसाळू शेळी असते त्यामुळे लोकांना या केसांचे काय करायचे ही अडचण वाटते. पण या केसांमुळे आपणास कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. जसे जसे केस वाढतील तसे तसे मेंढीप्रमाणे ते तुम्ही ट्रीम करू शकतात.

कुठून कराल खरेदी? : तुम्हाला जर काठेवाडी जातीची शेळी घ्यायची असेल तर त्यासाठी तुम्हाला जळगाव जिल्ह्यातील चाळीसगावला जावे लागेल. त्या ठिकाणी शेळ्यांचा आठवड्यातून एक दिवस आठवडे बाजार भरतो. याव्यतिरिक्त भुसावळ तसेच गुजरातमधील भावनगर येथे देखील मोठ्या प्रमाणात काठेवाडी शेळी पाहायला मिळते. या गावामधून तुम्ही काठेवाडी शेळी खरेदी करू शकतात.

## या खरिपात सोयाबीनसाठी पाच वाणांची लागवड ठरेल फायदेशीर

खरीप हंगामासाठी शेतकरी सोयाबीन लागवडीच्या तयारीत व्यस्त आहेत. परंतु, चांगले उत्पादन घेण्यासाठी योग्य वाण निवडण्याबाबत तो संभ्रमात आहे. सोयाबीनच्या टॉप ५ वाणांबद्दल सद्या बरीच चर्चा होत आहे. यातून शेतीचे उत्पादन वाढवण्यास तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासही मदत होऊ शकते. खरीप हंगामापूर्वीच सोयाबीनच्या अनेक जाती बाजारात आल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत कोणता वाण चांगला आहे किंवा कोणता वाण वेळ, परिस्थिती, हवामान आणि जमीन यानुसार चांगले उत्पादन देईल हे ठरविणे अवघड असते. यासाठी काही वाणांची माहिती घेण्याची गरज आहे. ज्यातून उत्पादनात वाढ होईल.



२०३४ विविधता : पिकापासून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी, आपण जेएस २०३४ पेरू शकता. या जातीच्या दाण्यांचा रंग पिवळा, फुलांचा रंग पांढरा आणि शेंगांचा आकार सपाट असतो. या जातीची पेरणी कमी पाऊस असतानाही करता येते. कमी पाऊस असलेल्या ठिकाणी शेतकरी या जातीची पेरणी करून चांगले उत्पादन घेऊ शकतात. सोयाबीन २०३४ जातीचे एक हेक्टरमध्ये सुमारे २४-२५ क्विंटल उत्पादन मिळते. हे पीक ८०-८५ दिवसात पक्क होते.

१४०७ विविधता : १४०७ ही सोयाबीनची नवीन विकसित केलेली जात आहे. आसाम, पश्चिम बंगाल, झारखंड, छत्तीसगड आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये याची लागवड केली जाते. ही जात ३९ क्विंटल उत्पादन देते. तसेच, ही जात गर्डल बीटल, लीफ मायनर, लीफ रोलर, स्टेम फ्लाय यांसारख्या प्रमुख कीटकांना प्रतिरोधक आहे. ही जात ईशान्य भारतातील पावसावर अवलंबून असलेल्या परिस्थितीसाठी योग्य आहे. ही जात १०४ दिवसांत तयार होते. त्यात पांढरी फुले, पिवळ्या बिया आणि काळी हिलम असते. याच्या बियांमध्ये तेलाचे प्रमाण १९.८१ टक्के आहे.

२०६९ वाण : सोयाबीनची २०६९ जात ही लवकर पिकणारी जात आहे. या जातीच्या पेरणीसाठी एकरी ४० किलो बियाणे लागते. या जातीपासून एक हेक्टरमध्ये सुमारे २२-२६ क्विंटल उत्पादन मिळू शकते. ही जात तयार होण्यास ८५ ते ८६ दिवस लागतात.

बीएस ६१२४ वाण : या जातीच्या पेरणीसाठी प्रति एकर ३५-४० किलो बियाणे आवश्यक आहे. उत्पादनाबाबत बोलायचे झाले तर एका हेक्टरमध्ये या जातीपासून सुमारे २० ते २५ क्विंटल उत्पादन मिळू शकते. ही जात तयार होण्यासाठी ९० ते ९५ दिवस लागतात. या जातीची फुले जांभळ्या रंगाची आणि पाने लांब असतात. तसेच याच्या बियांमध्ये तेलाचे प्रमाण २१ टक्के आहे.

१८१ विविधता : सोयाबीनच्या १८१ जातीची वाढ मर्यादित आहे. हे पिवळे मोज़ेक आणि टार्गेट लीफ स्पॉट रोगांना प्रतिरोधक आहे. भारतातील सपाट भागात या जातीची लागवड केली जाते. विशेषत: मध्य प्रदेशात, या जातीला परिपक्व होण्यासाठी ९३ दिवस लागतात आणि त्याचे सरासरी उत्पादन १६-१७ क्विंटल प्रति हेक्टर आहे.

## पॉलीहाऊसमध्ये भाजीपाला पिकवून वाढवा भरमसाठ उत्पन्न, सरकारकडूनही मिळते मदत

भारत सरकार शेतीचा विकास आणि विस्तार करण्यासाठी शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रे उपलब्ध करून देत आहे. या तंत्रांमध्ये संरक्षित लागवडीचे तंत्र समाविष्ट आहे. या तंत्राद्वारे शेतकरी हंगामी पिकांची लागवड करून चांगला नफा मिळवू शकतात. संरक्षित लागवड तंत्रांतर्गत, विविध भाज्या, फळे आणि फुले संरक्षित संरचनेत लागवड करता येतात. संरक्षित लागवडीअंतर्गत पॉली हाऊस आणि ग्रीन हाऊसमध्ये शेतीचे पर्याय दिले जातात.

पॉलीहाऊसमध्ये शेती करून शेतकऱ्यांना अनेक फायदे मिळतात. या तंत्राद्वारे शेतकरी प्लास्टिकच्या रचनेत हंगामी भाजीपाला सहज पिकवू शकतात. विशेषत: ज्या शेतकऱ्यांकडे लागवडीयोग्य जमिनीची कमतरता आहे, ते पॉलीहाऊसमध्ये भाजीपाल्याची आधुनिक शेती करून चांगला नफा कमवू शकतात. यामुळे मोकळ्या जागेचा उपयोग तर होईलच, पण चांगल्या उत्पन्नामुळे शहरांकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांचे स्थलांतरही थांबू शकेल.

पॉलीहाऊस काय आहे : पॉलीहाऊस म्हणजे लोखंड आणि प्लास्टिकच्या थरांनी बनलेली एक सीमा भिंत आहे, जी कीटक, रोग आणि हवामानापासून पिकांचे संरक्षण करते. एकदा



लोखंडापासून बनवलेल्या पॉलीहाऊसची रचना सुमारे ८-१० वर्षे चालवता येते. पण कालांतराने प्लास्टिकचा थर खराब होतो, त्यामुळे दरवर्षी किंवा दोन वर्षांनी तो बदलावा लागतो. मात्र, मिळालेल्या उत्पन्नातून त्याचा खर्च वसूल केला जातो.

कसे वापरायचे : पॉलीहाऊस हे शेतीचे अतिशय प्रभावी आणि सोपे तंत्र आहे. स्वत: कृषी विभागाचे तज्ज्ञ व अधिकारी शेतकऱ्यांना लागवडीसाठी मदत करतात. पॉलीहाऊस जमिनीपासून थोड्या उंचीवर वर करून बांधले जातात, जेणेकरून सुरक्षित संरचनेत पाणी भरू नये आणि कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये. कृषी तज्ज्ञांच्या मते, पॉलीहाऊसचे पडदे सकाळी काही वेळ उघडावेत, यामुळे पिकाला निसर्गाचा स्पर्श मिळतो. पॉलीहाऊसची रचना बाजारपेठेच्या जवळच्या भागात आणि रहदारीची उपलब्धता असलेल्या ठिकाणी बसवावी. पॉलीहाऊसमध्ये फक्त त्या भाज्या, फळे आणि फुले पिकवली जातात ज्यांना जवळच्या बाजारपेठेत मागणी आहे हे लक्षात ठेवा. यामुळे चांगला नफा मिळविण्यात खूप मदत होते.

फायदे काय आहेत : कमी जमिनीतून अधिक नफा मिळविण्यासाठी पॉलिहाऊस तंत्रज्ञानाचा वापर खूप प्रभावी ठरतो. त्याचा सर्वात मोठा फायदा असा आहे की या रचनेत शेतकरी देशी-विदेशी आणि हंगामी आणि हंगामी पिके अतिशय कमी खर्चात घेऊ शकतात.पॉलीहाऊसमधील शेतीसाठी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर केला जातो, ज्यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते. पॉलीहाऊसची रचना ही एक बंद रचना आहे, ज्यामध्ये कीटक येण्याची शक्यता कमी असते, यामुळे कीटकनाशकांच्या वापरावरही बचत होते. संरक्षित शेतीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यामध्ये रोगांचा प्रादुर्भाव कमी असतो. पॉलीहाऊसमध्ये शेती केल्याने अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ, उष्णता, जोरदार वारा, वादळ यांचा विशेष परिणाम होत नाही आणि पीक सुरक्षित राहते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४९० : मलिक अहमद या जुन्नर येथील बहामनी सेनापतीने उर्वरित बहामनी सैन्याचा पराभव करून जुन्नर येथे स्वतंत्र सल्तनतीची घोषणा केली.

१५०३ : पोप अलेक्झांडर सहाव्याच्या फतव्यानुसार स्कॉटलँडचा राजा जेम्स चौथा व मार्गारेट ट्युडोरचे लग्न झाले.

१५८८ : एकशे तीस युद्धनौकांवर ३०,००० सैनिकांसह स्पॅनिश आर्माडा इंग्लंडवर चाल करायला निघाला.

१७७४ : अमेरिकन क्रांती पहिल्या कॉन्टिनेन्टल काँग्रेसला सुरुवात.

१८३० : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष अँड्र्यू जॅक्सनने इंडियन रिमुव्हल ऍक्टवर सही करून स्थानिक अमेरिकन जमातींना स्थलांतर करण्यास भाग पाडले.

१८९२ : जॉन मुइरने सान फ्रांसिस्कोमध्ये सियेरा क्लबची स्थापना केली.

१९०५ : रशिया-जपान युद्ध-त्सुशिमाची लढाई जपानी दर्यासारंग टोगो हेहाचिरोने रशियाचे आरमार बुडवले व लढाई संपवली.

१९०७ : पहिली आइल ऑफ मॅन टीटी रेस आयोजित करण्यात आली.

१९१८ : अझरबैजानने स्वतःला स्वतंत्र घोषित केले.

१९३६ : ऍलन ट्युरिंगने ऑन कम्प्युटेबल नंबर्स हा शोधनिबंध प्रकाशित केला.

१९३७ : फ्रँकलिन डिलानो रूझवेल्टने वॉशिंग्टन डी.सी.मध्ये बटन दाबून सान फ्रांसिस्कोमधील गोल्डन गेट ब्रिज वाहतूकीला खुला केला.

१९३७ : नेव्हिल चेंबरलेन युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधानपदी.

१९४० : दुसरे महायुद्ध बेल्जियमने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.

१९५२ : ग्रीसमधे स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.

१९५८ : ७५ व्या वाढदिवसानिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा मुंबई महापालिकेतर्फे सत्कार करण्यात आला.

१९५९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने दोन अमेरिकन माकडांना अंतराळ यात्रा घडवून आणली.

१९६४ : पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन () ची स्थापना झाली.

१९७० : ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस पक्षाचे औपचारिकपणे विभाजन करण्यात आले.

१९९६ : भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा राजीनामा

१९९८ : भारताने केलेल्या अणुचाचणीला उत्तर म्हणून पाकिस्तानने पाच अणुबॉम्ब उडवले.

१९९९ : इटली मध्ये लिओनार्डो दा विंची यांचे द लास्ट सपर हे चित्र प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले.

२००४ : अयाद अल्लावी इराकच्या पंतप्रधानपदी.

२००८ : साली नेपाल मध्ये पुरातन काळापासून चालत आलेली राजशाही परंपरेचा अंत करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५२४ : सलीम दुसरा, ऑट्टोमन सम्राट.

१६६० : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १७२७)

१७३८ : जोसेफ-इग्नास गिलोटिन, फ्रांसचा डॉक्टर.

१७५९ : छोटा विल्यम पिट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.

१८८३ : क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १९६६)

१९०३ : उद्योगपती, किर्लोस्कर उद्योगसमूहाचे आधारस्तंभ शंतनुराव किर्लोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: २४ एप्रिल १९९४)

१९०७ : स्वातंत्र्यसेनानी रायगड मिलिटरी स्कूलचे संस्थापक दिगंबर विनायक तथा नानासाहेब पुरोहित यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९९४)

१९०८ : दुसर्‍या महायुध्दातील गुप्तहेर, लेखक, पत्रकार आणि जेम्स बाँड चा जनक इयान फ्लेमिंग यांचा जन्म. (मृत्यू: १२ ऑगस्ट १९६४)

१९२१ : शास्त्रीय गायक पं. दत्तात्रय विष्णू ऊर्फ बापूराव पलुसकर यांचा जन्म. (मृत्यू: २५ ऑक्टोबर १९५५)

१९२३ : तेलगू अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते व आंध्रप्रदेशचे १० वे मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९९६)

१९२५ : ब्युलेंट एसेव्हिट, तुर्कस्तानचा पंतप्रधान.

१९४६ : भारतीय कवी आणि समीक्षक के. सच्चिदानंदन यांचा जन्म.

१९४८ : प्रख्यात भारतीय मल्याळम आणि इंग्रजी भाषिक कवी आणि समीक्षक तसचं, मल्याळ भाषेतील आधुनिक काव्याचे प्रणेते, द्वैभाषिक साहित्य समीक्षक, नाटककार, संपादक, स्तंभलेखक आणि अनुवादक, भारतीय साहित्य जर्नलचे माजी संपादक आणि साहित्य अकादमीचे माजी सचिव के. सच्चिदानंदन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७८७ : ऑस्ट्रियन संगीतकार व व्हायोलिनवादक लिओपोल्ड मोत्झार्ट यांचे निधन. (जन्म: १४ नोव्हेंबर १७१९)

१९६१ : प. कृ. गोडे, प्राच्यविद्या संशोधक.

१९७९ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय चिकित्सक (डॉक्टर), शिक्षणतज्ज्ञ, बँकर आणि समाजसेवक डॉ. टोन्से माधव अनंत पाई यांचे निधन.

१९८२ : बळवंत दामोदर ऊर्फ कित्तेवाले निजामपूरकर यांचे निधन.

१९९४ : हिंदूसभेचे नेते व पुण्याचे महापौर गणपतराव नलावडे यांचे निधन.

१९९९ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते बी. विट्ठालाचारी यांचे निधन. (जन्म: १८ जानेवारी १९२०)

## थोडक्यात

### राष्ट्रीय विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के

बीड : प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट, बीड द्वारा संचलित राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय एम.आय.डी.सी. रोड बीड शाळेचा मार्च - २०२४ चा इयत्ता दहावीचा निकाल १०० % लागलेला आहे. शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. ४५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, २३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, १ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. जोगदंड प्रज्ञा श्रीकृष्ण ९४.६० % गुण घेऊन प्रथम, कोकणे स्नेहा संदीप ९२.६०% गुण घेऊन द्वितीय, भुरे आरती लक्ष्मण ९२.६०% गुण घेऊन द्वितीय, ओव्हाळ आकांक्षा पोपट ८९.६०% गुण घेऊन तृतीय, लांडे अपर्णा संजय ८९.४०% गुण घेऊन चतुर्थ देवकते दिव्या दादाराव ८९% गुण घेऊन पाचवी, राऊत वेदांत अभिजीत ८८.८०% गुण घेऊन सहावा, अंधारे मानसी सुरेश ८८.६०% गुण घेऊन सातवी, राऊत जानवी राजाभाऊ ८८% गुण घेऊन आठवी, माने श्वेता चंद्रकांत ८७.८० % गुण घेऊन नववी, आगे सुमित चत्रभुज ८७.४०% गुण घेऊन दहावा आला आहे. सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष माजी आमदार सिराजोद्दीन देशमुख, सचिव सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, मुख्याध्यापक चौधरी व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थी व पालक यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### जय हिंद विद्यालयाची निकालाची परंपरा कायम

बीड : जय हिंद कॅम्पस शैक्षणिक संकुल संचलित जय हिंद उर्दू माध्यमिक विद्यालयाचा दहावी वर्गाचा शैक्षणिक वर्ष सन २०२३ - २४ चा निकाल लागलेला असून प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी जय हिंद उर्दू माध्यमिक विद्यालयाने शंभर टक्के निकालाची परंपरा याही वर्षी कायम राखलेली आहे. शाळेमधील सय्यद फरहीन सय्यद खालिद हिने ८१.४०% गुण घेऊन शाळेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे व पठाण माहिन महमूद या विद्यार्थिनीने ८०.४०% गुण घेऊन शाळेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला आहे व सय्यद अलविरा सय्यद खालेद या विद्यार्थीनेने ७८.०% गुण घेऊन शाळेमध्ये तृतीय क्रमांक पटकावला आहे विद्यार्थ्यांच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट गुण घेऊन उत्तीर्ण झाल्याबद्दल जय हिंद एज्युकेशन कॅम्पस च्या वतीने संस्थेचे सचिव शेख निजाम जैनुद्दीन व प्राचार्या श्रीमती एस एल मॅडम, उपप्राचार्य समीर इनामदार, समीर बागवान सर, पठाण अमजद खान सर, शेख टी जे मॅडम, सय्यद अथर सर शेख टी एच मॅडम शेख सादिक सर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### छत्रपती शिवाजी विद्यालयाचा निकाल ९२ टक्के

माजलगाव दिनांक २७ ( प्रतिनिधी): येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून शाळेचा निकाल ९२.२० टक्के लागला आहे. यामध्ये अंजली रामेश्वर भोंड, रूपाली दीपक वारकरी, ओंकार शंकर पवार, वैष्णवी बालासाहेब काळे, अनुष्का दादासाहेब भुतकर यांनी गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय, क्रमांक मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण पाटील, सतीश दुगड , सचिव अशोक होके पाटील, इनायतखान पठाण, डॉ. योगिता होके पाटील, अभय होके पाटील, मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर, बालासाहेब झोडगे, विष्णू गडकर, आप्पासाहेब होके, माधव घोलप, अशोक रोडगे, दत्तात्रय इंगळे, पद्माकर शिंदे, अनंत शेजुळ सुरेश सोळंके ,पंकज कळसकर, शेख शहाणूर, तुळशीराम साळवे ,अमर राऊत, सत्यप्रिया होके पाटील, ज्ञानेश्वर पवार, अविनाश जाधव, दत्ता पांडे, दिनकर काळे यांनी अभिनंदन केले आहे.

### जवाहर विद्यालयाचा दहावीचा निकाल ९३ टक्के

माजलगाव :महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९३.५४ टक्के लागला असून निकिता कोरडे ९८.८०, वैष्णवी कोरडे ९५, मयूरी गिरगुणे ९४.४०, ओमकार राठोड ९३.४०, गायत्री जगताप ९१.८०, गायत्री कदम ९१.४०, आर्यन जगताप ९० अविनाश चव्हाण ८९.४०, विवेक पवार ८९.२०, वैष्णवी उंबरे ८९, ऋषभ गवळी ८८.२० असे गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपली यशस्वी परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष अॅड.एस.आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख, उपाध्यक्ष अॅड.आर.डी.भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी.देशमुख,संचालक शिरीष देशमुख,डॉ.सचिन देशमुख, राहुल मुळी, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक संतोष जोशी यांनी अभिनंदन केले.

### निर्लेखीत शासकीय वाहनाचा लिलाव

बीड: जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बीड येथील शासकीय मोटर वाहन क्रमांक एम.एच. १२ डब्ल्यु ४८०६ जीप महेंद्रा अॅन्ड महेंद्रा कमांडरचे आयुष्यमान २५ वर्षापेक्षा जास्त झाले असून धावसंख्या २१९१५७ इतकी झाल्यामुळे निर्लेखीत करण्यात आलेले आहे. प्रादेशीक परिवहन अधिकारी बीड यांनी सदर शासकीय वाहनाची लिलावाकरीता अंदाजे किंमत रुपये ३५०००/- इतकी ठरविलेली आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी दिनांक ५ जून २०२४ पर्यंत या कार्यालयाशी संपर्क साधून शासकीय वाहन खरेदी लिलावाकरीता हजर राहावे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांनी कळविले आहे. अधिक माहीतीकरीता ०२४४२-२२२१०५, ९४०४८६२६१३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# तहसिदार वर्षा मनाळे यांची छोट्या वाहनांवर आठवड्यात दुसऱ्यांदा कारवाई

### हायवा सारख्या मोठ्या वाहनांना मात्र बगल ?

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यात वाळू घाटाचा कोणताही अधिकृत शासकीय लिलाव झालेला नसतानाही अवैध वाळूची वाहतूक याठिकाणी मोठ्या प्रमाणात आहे. दरम्यान आठवड्यात दुसऱ्यांदा तहसीलदार वर्षा मनाळे यांनी छोट्या वाहनांवर कारवाई केली. मात्र हायवा सारखे मोठे वाहने याठिकाणी बिंदिकतपणे वाळू तस्करी करत आहेत. त्यांना का बगल दिली जात आहे? असा संशय सामान्यतून व्यक्त केला जात आहे.



वाळू घाटाचा लिलाव नसताना माजलगाव मोठ्या प्रमाणात वाळू तस्करी सुरू आहे. शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी वाळूची ढिगारेच ढिगारे पाहायला मिळतात. हा सर्व प्रकार महसूलसह पोलिसांच्या संगनमताने होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत.या तक्रारी वाढत असल्यामुळे तहसीलदार वर्षा मनाळे यांनी वाळू वाहतूक करणारा एक पिकअप गंगामासला येथे पकडून ताब्यात घेतला तर, कवडगाव थडी, गंगामसला येथे अनुक्रमे ४० आणि १५ ब्रास वाळूचा साठा जप्त केला आहे. तर दि.२६ मे रविवार रोजी दुपारी वाळू वाहतूक करणारा एक टेम्पो पकडला. त्याचप्रमाणे रात्री मंजरथ या ठिकाणी दोन ट्रॅक्टरही पकडले.

### महसूल प्रशासनाला हप्तेखोरीची कीड लागली- अॅड. गोले

माजलगावात महसूल प्रशासनाला हप्तेखोरीची कीड लागली आहे.जो हप्ता देत नाही त्याच्यावर कारवाई केल्या जात आहेत. मोठमोठ्या वाहनाद्वारे तालुक्यात वाळू तस्करी सुरु आहे. त्यांना का बगल दिली जात आहे. असा सवाल शेतकरी नेते ऑड नारायण गोले पाटील यांनी केला आहे.

तहसीलदार वर्षा मनाळे यांनी तत्परतेने या आठवड्यात दोन कारवाया केल्या. परंतु बिनदिकतपणे मोठमोठी हायवा वाहने याठिकाणी वाळूने भरून चालतात. त्यांना का बगल दिली जात आहे असा संशय सामान्यतून व्यक्त केल्या जात आहे.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

बीड । प्रतिनिधी

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना या परिक्षेची पुर्व तयारी करुन घेणेसाठी छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दिनांक १० जून २०२४ ते दिनांक २३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत कोर्स क्रमांक ६३ चे आयोजन करण्यात येत आहे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थीना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

तरी बीड जिल्हयातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोग घेण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बीड येथे दिनांक ६ जुन २०२४ रोजी मुलाखतीस हजर राहावे.

मुलाखतीस येतेवेळी त्यांनी यांच्या वेबसाइटवर सर्च करुन त्यामधील - ६३ कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन यावे.सदर सी डी एस वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खालील नमुद पात्रता असणे आवश्यक आहे व त्या संबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावेत. उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवार लोकसंघ आयोग नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणा-या सा डी एस या परीक्षेकरीता ऑनलाईन द्वारे अर्ज केलेला असावा.अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई मेल आय डी व दुरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किंवा व्हाटसअप क्र. ९१५६०७३३०६ वर संपर्क करावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांनी केले आहे

# मिशन यूपीएससी परीक्षेत आयशा तकदीस राज्यात प्रथम

### बीड सेंटरच्या अनेक विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी

बीड । प्रतिनिधी

निगहेबान फाऊंडेशन बीड आणि अल फैज फाउंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने, १० मार्च २०२४ रोजी राज्य स्तरावर अनेक जिल्ह्यांमध्ये घेतलेल्या परीक्षांमध्ये बीड केंद्राने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अलहुदा हायस्कूल, बीड येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी आयशा तकदीस शेख मोईजुद्दीन हिने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. बीड, अमरावती, जळगाव, अकोला, परभणी आणि नंदुरबार येथून हजारो विद्यार्थी मिशन यूपीएससी परीक्षेत बसले होते. बीड शहरातील विविध शाळांतील ७वी व ९वीच्या एकूण १९९ विद्यार्थ्यांनी बीड केंद्रातून या वर्गात सहभाग घेतला, त्यापैकी १४६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

राज्य स्तरावर, बीड ०१ गट ७ वी मधून उत्कृष्ट निकाल आला. त्याचप्रमाणे सय्यद मेहरीन अंजुम सय्यद माजिदुद्दीन अलहुदा उर्दू हायस्कूल बीड ची विद्यार्थिनी इयत्ता आठवीतून जिल्ह्यात प्रथम, अर्मीश फातिमा सय्यद फुरकान मिल्लिया कन्या विद्यालय बीड इयत्ता सातवीतुम जिल्हयात प्रथम, मोमीन आयदा अरबश मुहम्मद शफीउद्दीन मिल्लीया कन्या विद्यालय इयत्ता नववीमधून जिल्ह्यात प्रथम आली. , अदीब बागवान इलियास बागवान मिल्लीया बॉईज हायस्कूल जिल्हास्तर प्रथम, सय्यद अफिरा फातिमा सय्यद आरिफ मिल्लीया गर्ल्स स्कूल जिल्हास्तर द्वितीय, अदिना सारा मरघुब अलहुदा उर्दू प्राथमिक शाळा जिल्हास्तर तृतीय, सय्यद कहेकशा सय्यद लतीफ मिल्लीया गर्ल्स हायस्कूल जिल्हास्तर तृतीय येऊन त्यांनी आपले क्षमता सिद्ध केले. हा वर्ग आणि परीक्षा शहरातील मिल्लीया बॉईज हायस्कूलमध्ये घेण्यात आली. मिशन अंतर्गत, निगहेबान फाऊंडेशन बीडचे प्रमुख मुजतबा अहमद खान आणि त्यांच्या संपूर्ण टीमने विद्यार्थ्यांना अभ्यास वर्गांद्वारे तयार करण्यासाठी आणि परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी खूप प्रयत्न केले. या कार्यासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व टीम सदस्यांचे - मुख्याध्यापक, प्रभारी शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांचे निगहेबान फाऊंडेशन कृतज्ञ आहे. मिशन यूपीएससी मिशन बीड केंद्रासाठी अंजुमन ईशात-ए तालीम बीडचे सचिव खान सबीहा बाजी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा निगहेबान फाऊंडेशन बीड आणि अल फैज फाउंडेशन, जळगाव यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. आशा आहे की नवीन वर्षात उर्दू माध्यमाच्या शाळा यावर्षी या अभियानात मोठया संख्येने सामील होतील जेणेकरून त्यांचे विद्यार्थी देखील स्पर्धा परीक्षांना सामोरे जातील.

# १० वी बोर्ड परिक्षेत बुखारी ऊर्दू हायस्कुल चा ९४.८५% टक्के निकाल

माजलगांव । प्रतिनिधी

माध्यमिक शिक्षण विभाग मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परिक्षा २०२४ मध्ये बुखारी ऊर्दू हायस्कुल च्या विद्यार्थ्यांनी यशा चे शिखर गाठल्याने यंदा शाळेचा निकाल ९४.८५% लागला आहे.




माजलगांव येथील बुखारी ऊर्दु एज्युकेशनल संस्था संचलित बुखारी ऊर्दु हायस्कुल च्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश प्राप्त केले असुन शाळेतुन प्रथम क्रमांकावर सय्यद शाफे जावेद यांने ८४.४०% गुण प्राप्त केले आहे. द्वितीय क्रमांकावर मनियार अंशीरा करिम यांने ८२.८०% गुण प्राप्त केले आहे. तृतीय क्रमांकावर शेख शबनम इब्राहीम यांने ८१.६०% गुण घेवुन शाळेचे नाव उज्वल केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे पालक वर्गातुन कौतुक होत आहे. तसेच सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे बुखारी ऊर्दु एज्युकेशनल संस्थेचे सचिव खुर्शिद नाईक, अध्यक्ष अजहर नाईक, सहसचिव इम्रान नाईक, सदस्य शेख अब्दुल जब्बार,शेख हारुन, बासेत, मिनहाज, असद, मुजतबा, अजहर, मोहम्मद व सर्व शिक्षक व शिक्षिकांनी अभिनंदन केले आहे. व पुढील वाटचालिस शुभेच्छा दिल्या

# डॉ.ज्योती मेटे यांची आपुलकीची भेट दौऱ्यास सुरुवात

### नाळवंडी सर्कल मधून भेटीगाठीस सुरुवात

बीड । प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या हरग्राम शिवसंग्राम संकल्पनेनुसार शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती मेटे यांनी आज सोमवार दि.२७ मे पासून बीड ग्रामीण भागाचा दौरा सुरू केला असून नाळवंडी सर्कलमध्ये शुक्रवार,दि.३१ मे पर्यंत या भेटीगाठी दौरा होणार आहे.आज बकरवाडी,मौज,ब्रह्मगाव येथे सकाळच्या सत्रात भेटी देण्यात आल्या.समस्त गावकऱ्यांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले.याप्रसंगी शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायणदादा काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिलभाऊ घुमरे, बीड विधानसभा प्रमुख प्रा. सुभाष जाधव सर, बीड तालुकाध्यक्ष नवनाथ प्रभाळे, माजी सभापती ज्ञानेश्वर कोकाटे, किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष



राजेंद्र आमटे, बीड तालुका उपप्रमुख सुनील कुटे,नाळवंडी सर्कल प्रमुख बळीभाऊ थापडे,मैदाचे उपसरपंच सिताराम घुमरे, शिवणीचे सरपंच विजय सुपेकर,विशाल जाधव तसेच नाळवंडी सर्कल मधील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते मेटे साहेबांच्या बाबतीत जनसामान्यांची प्रेम व आदराची भावना विलक्षण असून लोकनेते मेटे साहेबांच्या प्रभावी जनसंपर्काची अनुभूती मला येत आहे आपुलकीच्या या भेटीने मी भारावून गेले असून आपला स्नेह संबंध व सामाजिक बांधिलकीचे नाते कायम राहतील अशा भावना डॉ.ज्योतीताई मेटे यांनी यावेळी व्यक्त केल्या.आगामी काळात शिवसंग्राम तुमच्यासोबत खंबीरपणे उभा असेल अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. ग्रामस्थांकडून मान्यवरांचा यथोचित स्वागत सत्कार करण्यात आला.मौजचे शिवसंग्राम नेते वैभव डावकर, ब्रह्मगावचे शिवसंग्राम नेते उल्हास घोरड, बकरवाडीचे नेते अशोक गाडे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत सत्कार केला.भेटीदरम्यान गावातील ज्येष्ठ व महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. याप्रसंगी ब्रम्हगाव येथील बप्पासाहेब घोरड संतोष बिडवे उपसरपंच अर्जुनसिंग ठाकूर, प्रभाकर घोरड,विक्रम घोरड, एकनाथ घोरड, उल्हास घोरड, विकास घोरड, दादासाहेब घोरड, कांताराम घोरड, नितीन घोरड, गणेश घोरड, भाऊसाहेब घोरड, मच्छिंद्र घोरड यशवंत घोरड दिलीप घोरड बप्पा साहेब घोरड, रेवन घोरड, निलेश घोरड, विलास घोरड बकरवाडी येथील परमेश्वर गाडे, देविदास गाडे, विभीषण गाडे, विष्णुपंत काळे, मोतीराम गाडे एकनाथ गाडे, विष्णू गाडे, रुक्मिणी गाडे, रुक्मिणी काळे , बळवंत डावकर. मोहन डावकर, मनोज डावकर, अंकुश डावकर, अंगद डावकर, रामदास डावकर, धनंजय डावकर, अमोल डावकर, वैभव रामचंद्र डावकर, हनुमंत डावकर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# वंजारी अधिकारी मतमोजणीला नको, हा तर बजरंग सोनवणेचा बालिशपणा -राम कुलकर्णी

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघात ०४ जुन रोजी मतमोजणी करताना जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे, तहसिलदार मुंडे यांना मत मोजणीत सहभाग देवु नका अशी मागणी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणेंनी करणं म्हणजे त्यांच्यातला बालिशपणा उघडा पडणं होय. लोकशाहीच्या मंदिरात राजकिय नेत्यांनी आदर्शाची पेरणी केली तर सामाजिक सलोखा वाढू शकतो. मात्र सोनवणे यांनी निवडणुक प्रक्रिया पार पाडतानाच केलेले द्वेषाचे राजकारण अजुनही त्यांच्या डोक्यातुन बाहेर निघत आहे हे दुर्दैव असुन ज्या कर्मचार्यांनी निवडणुक प्रक्रिया मतदानाच्या दिवशी पार पाडली, त्यापैकी ९० टक्के कर्मचारी बीड जिल्ह्यातील रहिवाशी आहेत. त्याचे तुम्ही काय करणार? असा सवाल भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केला.

बजरंग सोनवणे यांनी मत मोजणीला जिल्हाधिकारी आणि तहसिलदार यांचा सहभाग नसावा म्हणत जिल्ह्यातले अधिकारी असल्याचे सांगत विरोध दर्शविला आहे. खरं तर अत्यंत बालिशपणा असुन निवडणुकीत आपला पराभव होणार हे लक्षात आल्याने नैराश्यपोटी सोनवणे यांच्यासह त्यांचे नेतृत्व देखील खोडसाळपणा करताना दिसतात. बीड जिल्ह्यात बोगस मतदान केल्याचा व्हायरल व्हिडिओ जितेंद्र आवाड यांनी सोशल माध्यमावर टाकला. निवडणुक आयोगाने पडताळणी केल्यानंतर सदर व्हिडिओ हा परराज्यातला आढळून आला. मात्र संपुर्ण देशात अशा खोडसाळपणामुळे बीड जिल्ह्यातील जनतेचा अपमान झाला याची जबाबदारी सोनवणे घेणार का? १३ मे रोजी जिल्ह्यात मतदान प्रक्रिया अत्यंत शांततापुर्ण, सलोख्याच्या वातावरणात पार पडली. जिल्हा प्रशासनासह पोलीसांनी देखील चोख बंदोबस्त ठेवला. एकीकडे डोळ्यात तेल घालुन लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी प्रशासनातले अधिकारी काम करत असताना जबाबदार राजकिय पक्षाच्या नेत्यांनी अधिकार्यांनाच जातीपातीच्या बेडीत टाकणं खर्या अर्थाने बालिशपणाचं लक्षण म्हणावे लागेल. मत मोजणीला हे अधिकारी जिल्ह्यातले असल्याचे सांगत विरोध करणार्या सोनवणेंनी मतदानाच्या दिवशी प्रक्रिया पार पाडताना मतदान केंद्रावर उपस्थित असलेले ९० टक्के कर्मचारी बीड जिल्ह्यातले रहिवाशी मग त्यांचं काय करणार? असा सवालही कुलकर्णी यांनी केला. ०४ जुनच्या सुर्यकिरणातुन कमळ फुलणार हा राजकिय अंदाज सर्वश्रुत विरोधकांनी देखील मान्य केला. कदाचित त्यांच्या पक्षाचे शरदचंद्र पवार साहेब, प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटील, खोटं बोल पण रेटुन बोलणारे जितेंद्र आवाड यांना देखील पराभवाची खात्री पटली असावी. कदाचित नैराश्य, उद्वीगनेतुन वेगवेगळे आरोप विरोधक करत असल्याचे कुलकर्णी यांनी पत्रकात म्हटले. देशाच्या संसदेत जाण्याचे स्वप्न पाहणार्या राजकिय नेत्यांनी निवडणुक निकालाआधी अशा प्रकारे द्वेषाच्या विष बियाची पेरणी करणं भावी पिढीसाठी चांगलं नाही या शब्दांत कुलकर्णी यांनी सोनवणे यांचा समाचार घेतला.


## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३६/२०२४**

**रोहन पि. मच्छिंद्र काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

**पहा रोहन पि. मच्छिंद्र काशिद रा. साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत नानाभाऊ बापु काशिद** यांचा दिनांक १५/०१/१९४० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०२/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०६/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित

**तहसिलदार, बीड**

# तिसऱ्या दिवशीही तालुक्यातील २१ गावे अंधारातच

## चक्री वादळाने महावितरणचे केले लाखोंचे नुकसान; विजेअभावी नागरिकांना पाणी मिळेना





**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यात शनिवार पासुन चक्री वादळाने हा-हाकार माजविला असून शनिवारी झालेल्या वादळी वार्यात अनेकांच्या घरावरील पत्रे हवेत उडून गेली तर दुसरीकडे शेतातील जनावरांचे चार्यांच्या गंजी व जनावरांचे शेडवरील पत्रे कागद उडाल्याप्रमाणे उडून गेली. एवढ्यावच वादळ थांबले नाही तर महावितरणचे खांब जमिनोदोस्त झाले. यामुळे तालुक्यातील जवळगाव व घाटनांदुर ३३ के.व्ही.केंद्रातील विजपुरठा बंद असल्यामुळे २१ गावे तिसर्या दिवशीही अंधारातच आहेत.

शनिवारी सायंकाळी ४ च्या सुमारास तालुक्यातील घाटनांदुर व बर्दापुर सर्कल मध्ये चक्री वादळाने धुमाकूळ घातला. यात महावितरण सह शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसार झाले. त्यातच अनेक गावातील घरावरील पत्रे देखील उडाल्याने त्यांच्या संसार उघड्यावर पडले आहेत. शनिवारी वादळ शांत झाल्यानंतर रविवारी महावितरणचे अभियंता सतिष गुडे यांनी आपल्या पथकासह महाविरणच्या पडलेल्या लाईन उभा करून त्यावर तारा देखील ओढल्या, नागरिकांना सायंकाळी तरी विज मिळेल अशी आशा होती परंतु रविवारी पुन्हा चक्री



वादळाने थैमान माजविला जे नव्याने उभे केलेले पोल देखील जमिनोदोस्त झाले. या वादळासह मुसधार पावसाने हजेरी लावल्यामुळे सर्व शेतामध्ये पाण्याचे डबके साचले होते. त्यामुळे आज तिसर्या दिवशी देखील महावितरणच्या अधिकारी व कर्मचार्यांना २१ गावातील विज पुरवठा सुरळीत करण्यात यश आलेले नाही. त्यामुळे पिठाच्या गिरण्या, विधंन विहिरी व विहिरी यावर विज पुरवठा खंडीत असल्यामुळे पाण्याचा प्रश्न बिकट बनला आहे. तसेच जनावरांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न देखील गंभीर बनला आहे.तरी महाविरणच्या अधिकार्याने वीज पुरवठा सुरळीत करून पुर्ववत करावा अशी मागणी होत आहे.

हायड्रोलिक ब्रेकरने पुसच्या कमानीचे काम सुरू

काल सायंकाळी चक्री वादळामुळे श्रीक्षेत्र पद्मावती देवीच्या प्रवेश द्वाराची कॉंक्रेटी कमान वादळात जमिनोदोस्त झाली. या कमानीखाली एक चार चाकी वाहन देखील कागदाप्रमाणे चपटे झाले. त्यातील प्रवासी चहा पिण्यासाठी गेल्यामुळे त्यांचा जीव वाचला परंतु या कमानीमुळे परळी ते लातूर जाणारा महामार्ग आज सायंकाळ पर्यंत देखील सुरू झाला नव्हता. तहसीलदार विलास तरंगे यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी लागलीच हायड्रोलिक ब्रेकर पाठवून ही कमान फोडण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.


# शालांत परीक्षेत गोदावरी कुंकूलोळ कन्या विद्यालयाचे घवघवीत यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मार्च २०२४ शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गो.कु.यो.कन्या विद्यालयाचा एकूण निकाल ९९.६६ टक्के इतका लागला असून विद्यालयातील विद्यार्थिनींनी घवघवीत यश प्राप्त केले असून - विद्यार्थिनीनी ९० टक्क्यापेक्षा जास्त गुण घेऊन सन्मानाचे स्थान प्राप्त केले आहे. विद्यालयातील संयुक्ता दुर्गादास चौधरी, सावरी कैलास पुसकर,अंकिता रामलिंग घुले या विद्यार्थिनींनी शंभर टक्के गुण घेऊन उच्चांक प्राप्त केला आहे. विद्यालयातील २९९ विद्यार्थिनी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाल्या त्यातील २९८ यश प्राप्त केले आहे.६३ विद्यार्थिनींनी ९० टक्क्यापेक्षा जास्त गुण तर २६ विद्यार्थिनींनी संस्कृत विषयात शंभर गुण प्राप्त केले आहेत.

विशेष प्राविण्यासह१८९,प्रथमश्रेणी ७० व्दितीय






श्रेणी ३२ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन यो.शि.संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर,पदाधिकारी जी.बी.व्यास,अ‍ॅड. जगदीश चौसाळकर, कमलाकर चौसाळकर,डॉ.शैलेष वैद्य,प्राचार्य भीमाशंकर शेटे,अ‍ॅड.कल्याणी विर्धे, प्रा.जयश्री देशपांडे,मुख्याध्यापिका एम.एस.कुलकर्णी, इतर पदाधिकारी शिक्षिका,शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचारी आदींनी केले आहे.

# सरस्वती माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम





**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर शहरातील सरस्वती माध्यमिक विद्यालय ची यशाची परंपरा कायम इयत्ता दहावीचा ९५.७० टक्के निकाल लागला शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. यामध्ये नाटकर अक्षदा या विद्यार्थिनीने ९५. ७१ तर दुसरी विद्यार्थिनी गवळी शिवांजली रवींद्र या विद्यार्थिनी ९२.६० टक्के डोईफोडे गायत्री अंकुश ९१.२० टक्के गुण घेऊन यश संपादन केले तसेच शाळेतील इतर गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक तोष्णीवाल सर, राठोड सर ,कुलकर्णी सर , कसपटे सर, चरखा मॅडम, शिंपले सर ,मुंडे सर बोबडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# श्रीमती साखरबाई विष्णुपंत थोरवे आदर्श माता पुरस्काराने सन्मानित

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

राजमाता जिजांऊच्या पदस्पर्शाने पावन झालेली महाराष्ट्राची भूमी ही साधू संतांची भूमी आहे. ही त्यागांची भूमी आहे,नररत्नाची भूमी आहे, शूरवीर योद्ध्यांची भूमी आहे. अशा या कर्मविरांच्या भूमीतून ज्यांनी राज्याबरोबर आपल्या गावचे नाव सुवर्ण अक्षराने उज्ज्वल केले. ज्यांनी आपल्या मातीशी इमान राखत कायम सत्कर्माला महत्त्व दिले असे एम.आय. टी युनिव्हर्सिटी पुणे येथे आपल्या कार्य कर्तुत्वाची छाप पाडणाऱ्या डॉ.महेश विष्णूपंत थोरवे यासारख



'नररत्न' ज्या मातेने या मातीला दिले अशा महान विभूती श्रीमती साखरबाई विष्णूपंत थोरवे यांना मराठवाडा मित्र परिवार पुण्याच्या वतीने मराठवाडा आदर्श माता-पिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे,अश्या अनेक मातापित्यांना सलाम करण्यासाठी दरवर्षी हा सन्मान सोहळा साजरा करण्यात येत असतो

मराठवाड्याच्या यशाची पताका देश-विदेशात फडकावणारे सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय व प्रशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे,आपल्या गावाबरोबर देशाचे, ◀◀ पान ३ वर

# किमान धार्मिक स्थळ परिसर स्वच्छता व पावित्र्य जपा -नवनाथ शिराळे पाटील

## स्वच्छता व पाणीपुरवठा याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे...!

**बीड । प्रतिनिधी**



बीड नगरपरिषदेत प्रशासकाच्या दुर्लक्षपणामुळे संपूर्ण शहरात घाणीचे साम्राज्य असून, सर्वत्र दुर्गंधी पसरल्याने जनसामान्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेषत: शहरातील बिंदुसरा नदी काठी असणारे सोमेश्वर मंदिर, कृष्ण मंदिर, मारुती मंदिर, खासबाग तुळजाई देवी मंदिर, पीर बाले दर्गा बालेपीर, मनशूर शहा दर्गा, शहंशावली दर्गा, कंकालेश्वर मंदिर, नीळकंठेश्वर मंदिर, सावता माळी चौक आदि परिसरात प्रचंड घाणीचे साम्राज्य निर्माण झाले. मृत जनावरे, कोंबड्यांचे पंखांची घाण शिवाय शहरातील कचरा नदी किनारी टाकल्याने मंदिर, मशिद परिसरात नागरिकांना दुर्गंधीशी सामना करावा लागतो. धार्मिक स्थळ परिसरात स्वच्छता व पावित्र्य राखण्याचे काम नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी करावे असे आवाहन भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा नगर परिषद माजी सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

तसेच मान्सून पूर्व बीड शहराची नाले साफ सफाई, कचऱ्याचे ढीग उचलून तातडीने साफ सफाई करणे आवश्यक आहे. शहरात तीव्र पाणी टंचाई असून, अद्याप अनेक भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात नाही. गोरगरीब जनतेची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी. यापूर्वी वारंवार मागणी करूनही मुख्य अधिकारी व प्रशासक यांनी गांभीर्याने दखल घेतलेली नाही. तरी आठ दिवसाच्या आत नाले सफाई, पाणी पुरवठा वेळेवर केला नाही तर भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल असा इशार नवनाथ शिराळे पाटील यांनी केला आहे.

# वीरशैव लिंगायत समाजाच्या गुणवंतांना यंदाही मिळणार शिष्यवृत्ती

## दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा; श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**



येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या वतीने यंदाही वीरशैव लिंगायत समाजातील दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. दरम्यान, दहावी आणि बारावी परीक्षेतील यशस्वी गुणवंतांचे श्री संस्थान मठातर्फे अभिनंदन करण्यात आले आणि मठाधिपती चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी गुणवंतांना शुभाशीर्वाद दिले.

### 'शैक्षणिक कार्यावर अधिक भर देणार'

**सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठ धार्मिक उपक्रमाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही भरिव कार्य करत आहे. समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी यासाठी गेल्या कित्येक वर्षांपासून सदर शिष्यवृत्ती अखंडितपणे दिली जाते. आपण समाजाचे देणेकरी लागतो, या उदात्त भावनेने सदरील शिष्यवृत्ती योजना लोकोपयोगी ठरत आहे, अशी माहिती मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली. दरम्यान, शैक्षणिक कार्यावर अधिक भर देण्यावर आपला प्रयत्न असल्याचे श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी सांगितले.**

लिंगैक्य श्री गुरु तपोरत्न प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज माजलगावकर यांनी अनेक वर्षांपासून समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. यंदाही गुरूपौर्णिमेला या शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी दहावी किंवा बारावी उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका आणि आधारकार्ड दिनांक १० जुलै २०२४ पर्यंत प्रत्यक्षात सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या व्यवस्थापनाकडे द्यावेत असे आवाहनही श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शिवहारआप्पा महाजन (भ्रमणध्वनी क्रमांक ८२७५८५२८९८) यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन श्री संस्थान मठ माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

# सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे मा उपाध्यक्ष तथा सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांचा वाढदिवस पाटोदा येथील बांगर निवासस्थानी प्रचंड कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत व उत्साहात साजरा झाला.

दरवर्षीप्रमाणे सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजन करण्यात आले होते यावेळी संत मीराबाई संस्थान महासांगवी च्या मठाधिपती ह भ प राधाताई महाराज यांनी शुभेच्छा देऊन उपस्थिततीताना रामकृष्ण बांगर यांच्या कार्यकर्तृत्वावर मार्गदर्शन



केले. प्रारंभी सकाळीच सौ सत्यभामाताई बांगर व कुटुंबीयांनी श्री राम कृष्ण बांगर यांचे वाढदिवसानिमित्त औक्षण केले. नंतर कार्यकर्त्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या शुभेच्छांचा स्वीकार करण्यात आला तसेच नवनिर्माण व प्रगती शिक्षण संस्थेच्या वतीने रामकृष्ण बांगर व सत्यभामाताई बांगर यांचा यथोचित सत्कार करून सर्व कर्मचारी बांधवांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. त्याचप्रमाणे वाढदिवसानिमित्त राज्यभरातून अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून व सोशल मीडिया च्या माध्यमातून व प्रत्यक्ष मोबाईल द्वारे आलेल्या शुभेच्छांचा स्वीकार करण्यात आला. या झालेल्या ◀◀ पान ३ वर

# शालांत परीक्षेत परळी तालुक्यात मुलींचीच बाजी

## परळी तालुक्याचा निकाल ९६.९९ टक्के

**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेत बीड जिल्हा अव्वल असून यात परळी तालुक्याने देखील बाजी मारली.परळी तालुक्याचा निकाल तब्बल ९६.९९ टक्के एवढा राहिला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या शालांत परीक्षांचा निकाल आज जाहीर करण्यात आला असून या परीक्षेत परळी तालुक्यातून ४ हजार १२७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.उत्तीर्ण होण्याचे प्रमाण हे ९६.९९ टक्के एवढे असून यामध्ये २ हजार २४२१ मुले व १ हजार ७०६ मुलीचा समावेश आहे.या शालांत परीक्षेत परळी तालुक्यात मुलींनी बाजी मारली असून मुलीचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९८.०४ टक्के तर मुलांचे प्रमाण हे ९६.२६ टक्के एवढे आहे.


# सैनिकी विद्यालयाचा १० वीचा निकाल ९८.७९ टक्के; विशेष प्राविण्यास ७९ विद्यार्थी उत्तिर्ण

**बीड । प्रतिनिधी**

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) ता.जि. बीड संचलित सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड या शाळेचा इयत्ता १० वी चा निकाल ९८.७९ % लागला असून विशेष प्राविण्यास ७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री खोड बी.एस. यांनी दिली.

सैनिकी विद्यालय, बीड येथील इयत्ता १० वी खुली तुकडीत ४० तर केवळ आदिवासी तुकडीत ४३ असे एकूण ८३ विद्यार्थी एस एस सी बोर्ड परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी ७९ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह तर ३ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले असून, ८३ पैकी ८२ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाचा निकाल ९८.७९ टक्के लागला आहे. विद्यालयामध्ये गुणानुक्रमे राज्यस्तरीय गुणवंत खो खो खेळाडू पवार सुदर्शन सुभाष ९६.४०% (प्रथम), काळे गजानन ईश्वर ९४.००% (द्वितीय),





काशीद आर्यन गणेश ९३.०० % (तृतीय) यांनी यश संपादन केले आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषणजी क्षीरसागर साहेब, उपाध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर मॅडम, संस्थेचे सहसचिव डॉ.योगेशजी क्षीरसागर साहेब, तसेच डॉ. सारिकाताई क्षीरसागर मॅडम व संस्था कार्यवाहक डॉ. व्ही.टी.देशमाने सर, डॉ.प्रा. सुधाकर गुट्टे सर यांच्यासह विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री खोड बी.एस. विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# डॉ. भगवान पवार यांचे निलंबन महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान अंतू पवार यांच्याविरुद्ध आर्थिक भ्रष्टाचार, लैंगिक छळ आदीं विविध तक्रारी प्राप्त होत्या. या प्रलंबित तक्रारींची दखल राज्य शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाने घेतली आणि सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या समितीने महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार त्यांचे निलंबन करण्याचा निर्णय घेतल्याने त्यांचे निलंबन करण्यात आले असल्याचे स्पष्टीकरण आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

डॉ. पवार यांना बडतर्फ नव्हे तर निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाच्या काळात चौकशी अधिक नि:पक्षपातीपणे व्हावी यासाठी त्यांना नंदुरबार येथे मुख्यालय देण्यात आले आहे. या चौकशी दरम्यान त्यांना आणि संबंधित तक्रारदारांना आपले म्हणणे मांडण्याची पुर्ण संधी आहे.

डॉ. भगवान पवार यांच्याविरुद्ध कंत्राटी महिलांच्या लैंगिक शोषणाच्या अनेक तक्रारी विभागाला प्राप्त झाल्या होत्या. त्याशिवाय अनियमित कामकाज, अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत अरेरावी, त्यांना मानसिक व आर्थिक त्रास देणे यासह आर्थिक घोटाळ्यांचे गंभीर आरोप शासनास प्राप्त झाले होते. सतत तक्रारी प्राप्त होत असल्याने २९ एप्रिल रोजी आरोग्य सेवा आयुक्तालयाने सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याचा समावेश असलेली तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली होती. पवार यांच्याविरुद्धच्या तक्रारींचे गंभीर स्वरुप पाहता निष्पक्ष चौकशी होण्याच्यादृष्टिने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ४ (१) (अ) मधील तरतुदीनुसार त्यांचे निलंबन करणे आवश्यक आहे अशी शिफारस समितीने केली होती. त्यानुसार त्यांचे निलंबन करण्यात आले. त्यांच्यावर चौकशी समितीने विविध आरोप ठेवले आहे.

पुढील सविस्तर चौकशी व विभागीय चौकशी करण्यात येणार आहे यात कोणताही हस्तक्षेप होऊ नये म्हणून डॉ. पवार यांना निलंबित करण्यात आले आहे, असे स्पष्टीकरण आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# दौंडसाठी स्वतंत्र महसूल अधिकारी नेमावा; शेतकरी व नागरिकांची मागणी

**दौंड । प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांत वेगवेगळी कारणे सांगत तालुक्यातील शेतकरीवर्गाला तलाठी आणि मंडलाधिकारी यांनी अक्षरशः वेठीस धरले आहे. यामुळे वैतागलेल्या लोकांनी आता दौंड तालुक्यासाठी स्वतंत्र महसूल अधिकारी नियुक्तीची मागणी केली आहे. या सर्व महसूल यंत्रणेच्या विरोधात तक्रार करावी म्हटले, तर तहसीलदार आणि प्रांताधिकारी हे निवडणुकीचे कारण सांगत सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध होत नाहीत, अशी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तालुक्यातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावरून दौंड तालुक्यासाठी महसूल विभागात एखादा खमक्या अधिकारी देण्याची मागणी आता सर्वसामान्य नागरिक करू लागले आहेत. जमिनीसंदर्भातील खरेदी खत, वारस नोंद, इकरार व इतर नोंदी प्रलंबित असून, नेमकी दाद कोणाकडे



मागावी, असा प्रश्न शेतकर्यांना पडला आहे.

दौंड तालुक्यासाठी स्वतंत्र प्रांताधिकारी कार्यालय मंजूर होऊन कार्यालय सुरू झाले असले, तरी प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांचे कसलेही नियंत्रण तालुक्यातील प्रशासनावर नाही. याचा फटका थेट शेतकरीवर्गाला बसत आहे. पालखी मार्गालगत असणाऱ्या एका गावात प्रांताधिकारी यांनी आदेश देऊनही त्या आदेशाची नोंद गेली एक वर्ष तलाठ्याने केलीच नाही. तो शेतकरी अक्षरशः वैतागून गेला असल्याचे पुढे आले आहे. या सर्व गोष्टींसाठी दरवेळी जिल्हाधिकारी यांना भेटावे लागेल की काय आणि थेट जिल्हाधिकारी यांनी सूचना केल्यानंतर जर तालुक्यातील कामे होणार असतील, तर तालुका पातळीवरील महसूल यंत्रणा नेमकी कशासाठी अस्तित्वात आहे, हादेखील मोठा प्रश्न आहे.

ऑनलाइन सातबाराच्या नावाखाली असंख्य चुका तलाठी आणि मंडलाधिकारी करत आहेत आणि याचा फटका संबंधित शेतकर्यांना बसत आहे. दुरुस्त्या करण्यासाठी शेतकर्यांना तहसील कार्यालयाच्या वार्या कराव्या लागत आहेत. ऑनलाइन चुकांना संबंधित कर्मचार्यांनाच जबाबदार धरून कारवाई होणे गरजेचे आहे, असे शेतकऱ्यांचे मत आहे. लोकसभा निवडणुकीच्या नावाखाली गेल्या तीन महिन्यांत महसूलच्या वरिष्ठ अधिकार्यांपासून ते कोतवालापर्यंत सर्वांनीच निवडणुकीचे कारण सांगत कामे करण्यास टाळाटाळ केली. आता निवडणुकीचे कामकाज संपून आठवडा उलटला तरीही निवडणुकीच्या नावावर अजूनही कामाला कोलदांडा सुरूच असल्याचे चित्र आहे.

# सिंहगडावर मधमाश्यांच्या हल्ल्यात पर्यटक जखमी; मोठी दुर्घटना टळली

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड किल्ल्यावर कल्याण दरवाजा परिसरात हुल्लडबाजी करीत पर्यटकांनी आग्या मोहोळाच्या पोळावर दगडफेक केली. त्यामुळे मधमाश्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. त्यात ९ पर्यटक जखमी झाले. पर्यटकांच्या मागे मधमाश्या धावत असताना प्रसंगसावधनता दाखत गडावरील सुरक्षारक्षकांनी धूर करून मधमाश्यांना पिटाळून लावले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. हा प्रकार रविवारी (दि. २६) सकाळी साडेआठच्या सुमारास घडला.



कल्याण दरवाजा प्रवेशद्वाराच्या तटबंदीशेजारील कड्याच्या कपारीत पाच-सहा आग्या मोहोळाची पोळे आहेत. रविवारी सकाळी शंभर-दीडशे पर्यटकांनी कल्याण दरवाजा प्रवेशद्वाराच्या परिसरात गर्दी केली होती. बांबूच्या बेटाजवळ कपारीत बसलेल्या मोहोळावर काही पर्यटकांनी दगड मारल्याने मोहोळ उठले. प्रथम तीन ते चार जणांना मधमाश्यांनी दंश केला. त्या वेळी त्यांना मदत करण्यासाठी गेलेल्या इतर पाच-सहा जणांचा मधमाश्यांनी जोरदार चावा घेतला. त्यामुळे 'वाचवा, वाचवा' असा आरडाओरडा करीत पर्यटक सैरावैरा देवटाक्याकडे धावत सुटले. पर्यटकांचा आरडाओरडा ऐकून पुरातत्व तसेच वन विभागाचे सुरक्षारक्षक सुमीत रांजणे, नंदू जोरकर, दत्तात्रय जोरकर, राहुल जोरकर, स्वप्निल सांबरे , राकेश पन्हाळकर, अमोल पढेर आदींनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी पर्यटकांना तेथून माथ्यावर आणले. नंतर कल्याण दरवाजा मार्ग बंद करून मधमाश्यांना पिटाळून लावण्यासाठी गवत व ओल्या फांद्या पेटवून धूर केला. त्यानंतर दोन-तीन तासांनी मधमाश्या शांत झाल्या. या परिसरात आग्या मोहोळाचे पोळे असल्याने पर्यटकांच्या सुरक्षेसाठी खबरदारीचे फलक लावण्यात यावेत, अशी मागणी हवेलीचे माजी पंचायत सदस्य दत्तात्रय जोरकर यांनी केली आहे. सिंहगड वन विभागाचे वनपरिमंडळ अधिकारी समाधान पाटील, वनरक्षक बाळासाहेब वाईकर, संदीप कोळी, नितीन गोळे आदींनी कल्याण दरवाजात धाव घेतली. सुरक्षेसाठी कल्याण दरवाजा व परिसरात सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले.

# माजी आमदार शरद सोनवणेंचा जुन्नर तहसील कार्यालयावर मोर्चा

**पुणे । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यात बिबट्याची वाढणारी संख्या शेतकऱ्यांच्या मुळावर उठली असून दररोज कुठे ना कुठे बिबट्याचा हल्ला होताना पाहायला मिळतोय. बिबट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा आणि वनविभागाचे उप वनसंरक्षक अमोल सातपुते यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, या मागणीसाठी जुन्नर तहसील कचेरीवर जुन्नरचे माजी आमदार शरद सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. २७) मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये धनगर बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे बांधवांनी या मोर्चामध्ये मेंढरं सहभागी करून घेतली होती.

सोमवारी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घालून मोर्चाला सुरवात करण्यात



आली. जुन्नर शहरामधून मोर्चाची फेरी काढण्यात आली. या मोर्चामध्ये शेतकरी संघटना सहभागी झाली होती. संघटनेचे युवा आघाडीचे जुन्नर तालुकाध्यक्ष सचिन थोरवे, शेतकरी संघटनेचे नेते अंबादास हांडे उपस्थित होते. विविध मागण्यांचे फलक हातात घेण्यात आले होते. दरम्यान जुन्नरचे माजी आमदार शरद सोनवणे गेल्या चार दिवसापासून आळेफाटा येथे उपोषणाला बसले आहेत. ते स्वतः जुन्नरच्या मोर्चात पायी सहभागी झाले होते.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्यास अटक : खामगाव टेकमधील मुलीची सूटका

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

खामगाव टेक (ता. हवेली) येथील शेतमजुराच्या मुलीचे दुचाकीवरून अपहरण करणार्यास पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथून अटक केली. अशोक छगन राजपूत (वय ४०, रा. तांबीगोटा वस्ती, मांजरी, छत्रपती संभाजीनगर) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्या राहत्या घरातून मुलीसह त्याला ताब्यात घेतले. अपहरणकर्ता ऊसतोडणी कामासाठी यापूर्वी खामगाव टेक येथे वास्तव्यास होता, अशी माहिती पोलिस तपासात उघड झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजपूतने मुलीचे अपहरण करण्याच्या दृष्टीने मुलीच्या कुटुंबीयांशी सलगी केली. त्यानंतर तिला दुचाकीवरून पळवून नेले. आरोपीचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांपुढे होते. आरोपीबद्दल मिळत नसलेली माहिती व अपहरणकर्त्याच्या दुचाकी क्रमांकात असलेली अस्पष्टता, यामुळे पोलिसांना आरोपीपर्यंत पोहचण्यासाठी मेहनत घ्यावी लागली. दुचाकीचे सर्व डिजिटल नंबर प्रत्येक जिल्ह्यातील क्रमांकांशी जोडत पोलिस



आरोपीपर्यंत पोहचले. आरोपीच्या घरचा पत्ता शोधून काढत पोलिसांनी राजपूतच्या मुसक्या आवळल्या. या गुन्ह्याचा तपास दौंडचे उपविभागीय पोलिस अधिकारी स्वप्निल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उरुळी कांचनचे पोलिस निरीक्षक शंकर पाटील, प्रभारी निरीक्षक नारायण देशमुख, गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांनी केला. पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी सहा पथकांची नेमणूक केली होती.

# विषारी साप चावल्याने चार वर्षांच्या मुलीचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

विषारी साप चावल्याने वैष्णवी महेश केवटे (वय ४, सध्या रा. पळसदेव शेलारपट्टा, ता. इंदापूर, मूळ रा. कान्हापुरी, ता. पंढरपूर) हिचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी (दि. २४) मध्यरात्री घडली. कोपीमध्ये साप गेल्याचे शुक्रवारी सायंकाळी केवटे त्यांच्या घरातील अनेकांनी पाहिले होते. सापाला कोपीतून बाहेर काढण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. साप निघून गेला असेल, असे समजून त्यांनी तो विषय तेथेच सोडून दिला. जेवण झाल्यानंतर सगळे झोपी गेले. मध्यरात्री सापाने वैष्णवीच्या कानाचा दोन वेळा चावा घेतला.



वैष्णवी मोठ्याने रडत आईला कानाजवळ व डोक्यात मुंग्या येत असल्याचे सांगत होती, तर बहीण कानातून रक्त येत असल्याचे दाखवत होती. थोड्याच वेळात वैष्णवीला उलट्या व जुलाबाचा त्रास सुरू झाला. वैष्णवीचे वडील मासे पकडण्यासाठी गेले होते. फोनवरून त्यांना घटनेची माहिती देताच ते घरी आले. उपचारासाठी वैष्णवीला गावातील खासगी दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी इंदापूर येथील शासकीय रुग्णालयात जाण्यास सांगितले. इंदापूर येथील शासकीय रुग्णालयात डॉक्टरांनी तिला उपचारापूर्वीच मृत घोषित केले.


# रात्रीच्या वेळी प्रशिक्षण विमानाबरोबरच ड्रोनच्या घिरट्या : नागरिकांमध्ये संभ्रमावस्था

**बारामती । प्रतिनिधी**

मागील एक आठवड्यापासून दौंड व बारामती परिसरात रात्रीच्या वेळी आकाशात फिरणार्या ड्रोनमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दौंड तालुक्यातील वरवंड, पाटस, खोर; तर बारामती तालुक्यातील वढाणे, बोरकरवाडी, सुपे परिसरात हे ड्रोन फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीबरोबरच चोरट्यांबाबत दहशतीचे वातावरण तयार झाले आहे.

याबाबत माहिती देताना बारामती एअरपोर्ट व्यवस्थापक विभागाच्या प्रमुख हेमलता निलाखे म्हणाल्या, दौंड व बारामतीच्या परिसरात रात्रीच्या सुमारास आमची प्रशिक्षण घेणारी शिकाऊ विमाने असून, नागरिकांनी भीती बाळगण्याचे काहीही कारण नाही.

आमच्या वैमानिकांना रात्रीच्या वेळीस विमान कसे चालवायचे याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. हे विमान अगदी लहान असून, याचा आवाज जास्त येत नाही. रात्रीच्या वेळी फक्त लाईट दिसते. हे जमिनीपासून एक ते दोन किलोमीटर



अंतरावर फिरत असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, याच बरोबरच ड्रोनदेखील अवकाशात घिरट्या मारीत असल्याने नागरिकांनी सांगत याबाबत सवाल उपस्थित केला आहे. ड्रोन कोणत्या उद्देशाने फिरवले जाते व या मागील हेतू काय? याचा मास्टरमाईंड शोधून काढण्याचे काम पोलिस प्रशासन व महसूल विभागाने हाती घेण्याची मागणी पुढे आली आहे. बेकायदेशीररीत्या कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता हे ड्रोन रात्रीच्या वेळी आकाशात फिरवून दहशत पसरविण्याचे काम कोण जाणूनबुजून करीत आहेत, याचा खुलासा बारामती व दौंड प्रशासन तसेच एलसीबीने करण्याचे गरजेचे आहे.

नागरिकांनी हे ड्रोन पडण्याचे संकेत दिले आहे. या वेळी चुकून बारामती एअरपोर्टचे प्रशिक्षण घेणारे विमान पाडले गेले तर मोठा अनर्थ घडू शकतो. त्यामुळे घटनेच्या मुळाशी जाऊन या गोष्टीचा छडा लावून बारामती, दौंड व यवत पोलिस ठाणे तसेच दोन्ही तालुक्यांतील तहसीलदारांनी याबाबत सखोल खात्री करून घेणे गरजेचे असून, नागरिकांमधील संभ्रमावस्था दूर करावी, अशी मागणी होत आहे.

# दारू विक्रीच्या कडक नियमांनी पुण्यात तळीरामांची अडचण

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणीनगर भागात पोर्शे कार अपघातात दोघांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर विविध स्तरावून रोष उमटला. या अपघाताला घेऊन आतापर्यंत पोलिसांनी सात जणांना अटक केली आहे.

त्यामध्ये अल्पवयीन मुलगा, त्यांचे वडील विशाल अगरवाल, आजोबा सुरेंद्र कुमार अगरवाल आणि पब मालक सह मॅनेजर यांचा समावेश आहे. या घटनेनंतर पोलिसांनी आपल्या कारवाईला वेग दिल्याचे दिसत आहे. अनेक अनधिकृत पब जमीनदोस्त करण्यात आले. आता पुण्यात जवळपास सगळयाच मद्य विक्रीच्या दुकानावर पाटी लावत महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ नुसार दारू विक्रीचे नियम व अटी त्यामध्ये देण्यात आल्या आहेत.

यामध्ये २१ वर्षाखालील व्यक्तीला दारू दिली जाणार नसल्याचे म्हंटले आहे. तसेच २१ ते २५ वयोगातील व्यक्तींना सौम्य बिअर विकली जाणार आहे. तर २५ वर्षावरील व्यक्तीला सर्व प्रकारचे मद्य विकले जाणार आहे. त्यामध्ये व्हिस्की, रम, व्होडका बिअर यांचा समावेश असणार आहे. याआधी बियर शॉप, वाईन शॉप वाले येईल त्याला दारू विकत होते मात्र अशा कारवाईनंतर जर मद्य घेण्यासाठी अल्पवयीन मुलगा दिसला तर तुला दारू मिळणार नाही सांगत माघारी पाठवत आहेत. दारूसाठी मोठ्या व्यक्तीला पाठवून देण्यासाठी सांगत आहेत. त्यामुळे तळीरामांना अडचण निर्माण होत आहे.

# आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यात फेरफार, डॉक्टरांच्या अटकेनंतर काँग्रेसचा हसन मुश्रीफांवर आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणीनगरमध्ये १९ मे रोजी एका भरदाव पोर्श कारने एका दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला. ही कार चालवणारा अल्पवयीन आरोपी त्यावेळी मद्यधुंद अवस्थेत होता. मात्र पोलिसांनी त्याचे रक्ताचे नमुने तपासणीसाठी ससून रुग्णालयातील फॉरेन्सिक विभागाला पाठवले असता ससूनने वेगळाच अहवाल दिला. या मुलाच्या रक्तात अल्कोहोल आढळलं नसल्याचा अहवाल ससूनच्या डॉक्टरांनी दिला होता. मात्र या मुलाने अपघाताच्या काही वेळ आधी दोन पबमध्ये मद्यपान केल्याचे सीसीटीव्ही व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी अधिक तपास करण्यास सुरुवात केली.

दरम्यान, या मुलाच्या रक्ताच्या नमुन्यांमध्ये फेरफार केल्याप्रकरणी ससूनच्या फॉरेन्सिक विभागातील दोन डॉक्टरांना आज सकाळी अटक करण्यात आली आहे. डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हरलोर अशी या अटक केलेल्या डॉक्टरांची नावं आहेत. तावरे हे ससूनच्या फोरेन्सिक विभागाचे प्रमुख आहेत. अपघातानंतर अल्पवयीन मुलाच्या वडिलांनी डॉ. तावरे यांना फोन केला होता, असं पोलिसांनी म्हटलं आहे.

ससूनमधील डॉक्टरांवर केलेल्या कारवाईनंतर याप्रकरणी सातत्याने पाठपुरावा करणारे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. ससून रुग्णालयातील ज्या दोन डॉक्टरांना अटक केली आहे ते डॉक्टर हसन मुश्रीफ यांच्या आशीर्वादाने काम करत होते असा आरोप कसबा पेठ विधानसभेचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला आहे. ते म्हणाले, मी गेल्या वर्षभरापासून ससून रुग्णालयाच्या ढिसाळ कारभारावर बोलतोय मात्र त्यावर आतापर्यंत प्रशासनाने किंवा मंत्र्यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही.

रवींद्र धंगेकर म्हणाले, मी सातत्याने ससून रुग्णालयातील कारभारावर प्रश्न उपस्थित केले आहेत. मी याआधी डॉ. संजीव ठाकूर यांच्या अटकेची मागणी केली होती. मात्र आजपर्यंत त्यांना अटक झाली नाही. हे सरकार त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे. या खात्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांचे डोळे अजून उघडलेले नाहीत. डॉ. तावरेसारख्या लोकांना त्या खुर्चीवर बसवण्याचा प्रताप हसन मुश्रीफ यांनीच केला आहे. जर हसन मुश्रीफच असं वागत असतील तर आपण चांगल्या कारभाराची अपेक्षा तरी कशी करणार? मुळात हे सरकारच घोटाळेबाज आहे, राज्यातील जनता या सरकारला जागेवर आणण्याचं काम करेल. या लोकांनी ससूनमध्ये एक मोठा घोटाळा केला आहे, तो देखील लवकरच जनतेसमोर येईल.

अपघात झाला त्या रात्री अजय तावरेला कोणाचा फोन आला होता?

कसबा पेठचे आमदार म्हणाले, डॉ. अजय तावरे याला आज ज्या प्रकरणात अटक झाली आहे असे प्रकार तो वर्षानुवर्षे करत आला आहे. लोकांचे रक्तगट बदलणे, रक्ताचे नमुने बदलणे, रक्ताचे अहवाल बदलणे हा त्याचा नेहमीचा धंदा आहे. ससूनसारख्या सरकारी दवाखान्यात हसन मुश्रीफ यांनी लाडावलेली पिलावळ बसली आहे. ही पिलावळ मुश्रीफांच्याच आशीर्वादाने काम करत आहे. मला वाटतं अपघात ज्या दिवशी झाला त्या रात्री या तावरेला नेमका कोणाचा फोन आला होता याची चौकशी झाली पाहिजे आणि हसन मुश्रीफ यांनी राजीनामा दिला पाहिजे.

धंगेकर म्हणाले, तपास अधिकारी या प्रकरणाचा सखोल तपास करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच मला असं वाटतंय की या प्रकरणात आणखी काही मासे गळाला लागतील. या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांनी गोलमाल केला आहे तसेच ससूनमध्ये देखील गोलमाल झाला आहे. या लोकांवर खंडणीचा गुन्हा दाखल केला पाहिजे.

# पिस्टलचा धाक दाखवून लुटमार करणारे हिंजवडी पोलिसांच्या जाळ्यात

***पुणे । प्रतिनिधी***

पिस्टलचा धाक दाखवून लुटमार करणाऱ्या दोन इसमांना हिंजवडी पोलिसांनी अटक केली आहे. या दोन्ही इस्मंकडून देशी बनावटीचे दोन पिस्टल दोन जिवंत काढतोस आठ ग्राम वजनाची सोन्याची चैन व दोन दुचाकी असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे व त्यांच्यावर असलेले सहा गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहे.

अजय शंकर राठोड वय २१, रा. पाषाण व ईशान झहीर खान वय २३, रा. दापोडी,मूळ राहणार बिजनोर, उत्तर प्रदेश असे अटक केलेल्या आरोपींची चे नाव असून, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या सूचनेप्रमाणे हिंजवडी पोलीस ठाणे, गुन्हे शोध पथकाचे सहा. पो. नि. राम गोमारे व तपास पथकातील अंमलदार सहा. पो. उप नि. नरेश बलसाने, पो. हवा. नरळे, पो. ना. चव्हाण, गडदे, पो.शी. कांबळे शिंदे व पालवे असे दोन वेगवेगळ्या टीम तयार करून हिंजवडी पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांवर व अवैध अग्निशस्त्र व घातक हत्यार जवळ बाळगनाऱ्या इसमांनवर कारवाई करण्याचे अनुषंगाने पेट्रोलिंग करत असताना तपास पथकाचे प्रभारी, सहा. पो.नी. राम गोमारे यांना माण फेज ३ हिंजवडी येथे सहा.पो. उप नी. नरेश बलसाने यांना सुच ब्रिज खाली येथे वेगवेगळ्या दोन्ही सम गावठी कट्टे घेऊन येणार असले बाबतची गुप्त माहिती प्राप्त झाली असता त्यांनी दोन वेगवेगळ्या टीम करून मान फेस थ्री हिंजवडी व सुच ब्रिज खाली सापळा लावून दोन्ही समानता ताब्यात घेऊन त्यांच्याकडून सदरचा मालमत्ता जप्त केला आहे. शंकर राठोड वझेशन खान हे एकमेकांचे मित्र असून त्यांनी दोन्ही मोटरसायकल बावधान वस्तू येथून चोरी केल्या असल्याच्या तपासात निष्पन्न झाला आहे दोघांना पोलीस कोठडी रिमांड मध्ये असताना कौशल्य पूर्वक तपास केला असता त्यांनी त्यांच्या तीन साथीदारांसोबत मिळून रिवरच्या धाक दाखवून जवळील डोंगरावर एकाचे अपहरण करून त्यांच्या गळ्यातील आठ ग्रामपंचायत सोन्याची चैन जबरदस्तीने काढून घेतल्या असल्याचा देखील निष्पन्न झाला आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चोबे, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त परिमंडळ २ - बापू बांगर, सहा. पोलीस आयुक्त वाकड विभाग - विशाल हिरे, यांच्या मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात, पोलीस निरीक्षक गुन्हे ऋषिकेश घाडगे तपास पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस अमलदार बंडू मारणे, बाळकृष्ण शिंदे, नरेश बलसाने, बापूसाहेब धुमाळ, योगेश शिंदे, कैलास केंगले, कुणाल शिंदे, विक्रम कुदळ, अरुण नरळे, रितेश कोळी, श्रीकांत चव्हाण, चंद्रकांत गदडे, कारभारी पावले, दत्ता शिंदे, अमर राणे, ओम प्रकाश कांबळे व सागर पंडित यांनी केली आहे.